# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०३/१०/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि. ३०/०८/२००३ रोजीची तहकुब स्थायी समिती सभा सोमवार दिनांक ०३/१०/२००३ रोजी सभा सुचना क्र. १५ दि. २७/०८/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ३) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ५) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ८) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| ९) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १०) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | सदस्य |
| ११) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १२) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १३) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन म. पाटील | सदस्य |
| २) | श्री. नितीन गो. ठाकूर | सदस्य |
| ३) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |

**मॉरस रॉड्रीक्स (मा. सभापती)**

सर्व उपस्थित सन्मानीय सदस्य, अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला सुरुवात करण्यात यावी. तत्पुर्वी सर्व सन्मा. सदस्यांनी आपले मोबाईल व्हायबरेटवर ठेवावे. तसेच सर्व सभासदांना सांगू इच्छितो की विषय पत्रिकेवर जे विषय आहेत त्याच विषयावर बोलायचे आहे. आणि विषय संपल्यानंतर जी काही चर्चा करायची असेल ती चर्चा आपण करु शकतो व तो विषय स्थायी समितीमध्ये घ्यायचा असे ठरले तर तो विषय स्थायी समितीमध्ये घेवू शकतो. आपण सर्वजण मला चांगल्या प्रकारे सहकार्य कराल अशी मी आशा बाळगतो.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

गेल्या सभेत सांगण्यात आले होते की, विकास आराखडयामध्ये जे आरक्षणाचे बोर्ड लावायचे आहेत त्या बोर्ड बद्दल लेखी अर्ज दिले होते पण बोर्ड अजून का मिळाले नाही.

**आसिफ शेख :-**

आजची पहिली सभा नवनिर्वाचीत सन्मा. सभापती यांच्या अध्यक्षतेखाली आज सुरू झाली आहे. वर्षभरातील कार्यासाठी आम्ही शुभेच्छा देतो व त्यांना विनंती करतो की ज्याप्रमाणे मंत्रिमंडळाची बैठक

दर मंगळवारी असते त्या प्रमाणे आपल्या स्थायी समितीची बैठक आहे. ती सोमवारी किंवा मंगळवारी घेण्यात यावी जेणे करून पाच सहा दिवस अधिका-यांना मिळतात. आपण जो निर्णय घेतो त्याची अंमलबजावणी होण्याकरीता व व्यवस्थीत सुरळीत कामकाज होईल. आणि आपल्याला मी पुन्हा शुभेच्छा देतो.

**मॉरस रॉड्रिक्स (मा. सभापती) :-**

आपण आता जे बोलतात या बाबत मी अधिका-याबारोबर चर्चा केलेली आहे. त्यांना सोमवारी किंवा मंगळवारी सभा घेण्यास जमत नाही. कारण त्यांना सभेसाठी जी तयारी करायची असते त्याकरीता वेळ लागतो.

**आसिफ शेख :-**

आठवडयातून एक दिवस मंगळवार आपण सभेसाठी फिक्स करा.

**प्र. सचिव :-**

सोमवारी अजेन्डा काढला की त्यापुढील कामकाज करण्यासाठी वेळ मिळतो आणि सभा जर सोमवारी किंवा मंगळवारी लावायचे म्हटले तर आपल्याला अजेन्डा काढून वाटायचा असतो व आपल्याला दुस-या व चौथ्या शनिवारी सुट्टी असते. ते देखिल आपण लक्षात घेतले पाहिजे. तसेच उपविधीमध्ये सभा गुरुवारी घेण्यात यावी असे दिलेले आहे.

**आसिफ शेख :-**

ठिक आहे. आपण ठराविक दिवस फिक्स करा. दर गुरुवारी सभा घ्या.

**धनराज अग्रवाल :-**

मा. सभापती मॉरस रॉड्रिक्स, उनका सबसे पहिले अभिनंदन करता हूँ पहिले सभा मे सभा का कामकाज सभी के साथ मिलकर अच्छि तरह हर एक संतुष्ट करेंगे ऐसी आशा करता हूँ। सभा चालू होने से पहिले मे आपको कुछ बाते बताना चाहता हूँ जुनी स्थायी समिती सभा मे हर पार्टि के लिए केबिन देने का प्रस्ताव दिया था। वो निचे दिये गये है लेकिन गटनेताने प्रशासनको पत्र दिया है की, सदस्यो की संख्या उसके नुसार कॅबिन देना चाहीये। एक पार्टि के तिन सदस्य, एक पार्टि के उन्नीय सदस्य है सोळा सदस्य है जिस तरह सदस्यो की संख्या है उस तरह से कॅबिन बनाने चाहीये अगर उसमे हम सोळा सदस्य बैठ नही सकते, तो उसका कुछ मतलब हि नही रहेगा। मैं आपसे फिरसे प्रशासनसे, सभापतीसे विनंती करुगा की, उसके बारे मे फिरसे विचार किया जाय और उसकी उचित व्यवस्था की जाय।

**मा. सभापती :-**

प्रशासनसे चर्चा करके आपको बता दुंगा।

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, सभा चालू होण्यापूर्वी मागे एक ठराव सिमेंटची पाईप लाईन महानगरपालिका बंद करणार आहे त्याची शिफ्टींग करायची आहे. त्या ठरावामध्ये माझ्या मते सचिव साहेब आहेत.उपायुक्त केळकर साहेब आहेत त्या वेळी निशुल्कपणे असे सांगितले गेले होते. पण आपण निशुल्क न सांगता पाचशे रुपये मिनिमम चार्ज दयावा या पध्दतीने ठराव केला होता. आणि आता आम्ही जेव्हा पाचशे रुपयांचे नागरीकाना सांगितले नंतर दशोरे साहेबाबरोबर बोलल्यानंतर ते आम्हाला सांगतात बोरींग चार्ज घेणार, खडडा चार्ज घेणार, मग तुम्ही आम्हाला माफ केले काय त्यामुळे तो जसा ठराव झालेला आहे व साहेबांनी बोलले होते की निशुल्क करु नका. निशुल्क केल्यानंतर वेगळे वळण येईल त्याकरीता आपण नॉरमल चार्ज म्हणून पाचशे लावले होते व तसे तसे मान्य केले होते व ठराव झाला होता. आणि जर बोरींग चार्ज आणि खडडा चार्ज असेल तर नागरीकांनी त्याची गरज नाही आपण आम्हाला त्या लाईन साफ करुन दया. त्याच लाईन मधून आम्ही पाणी घेवू मग आम्ही हा खर्च कशाकरीता करणार.

(मा. उपआयुक्त श्री. कल्याण केळकर साो. यांनी दिनांक २८/०८/२००३, प्रकरण क्र. १३४ चे वाचन केले.)

**शरद पाटील :-**

खड्डा चार्जेस आणि बोरींग चार्जेस लावले म्हणून तर हा विषय सभेसमोर आणला होता. त्याचे आपण काय केले ? हयात नागरीकांची काय चूक आहे.

**रिटा शाह :-**

येथे एक संशय होतो. आपण येथे बोरींग चार्जेस भरायचे आहे. मग बोरींग चार्जेस आणि शिफ्टींग चार्जेसमध्ये फरक काय ?

**एस. के. दशोरे :-**

अडीच हजार ठरवून घेतले आहे .

**रिटा शाह :-**

बोरींग चार्जेस लावले आहे . मग परत त्याला जोडायचे आहे. ते जोडायचे चार्जेस आणि मग शिफ्टींग चार्जेस पाचशे रूपये कशाला ?

**शरद पाटील :-**

जी पाईप लाईन आपण बंद करतोय त्याचे नागरींकावर बर्डन पडायला नाही पाहीजे. नागरीक ते पैसे भरायला तयार नाही आणि सिमेंटच्या पाईप लाईनमधून घाण पाणी आले व रोगराई पसरली तर त्याला प्रशासन जबाबदार राहणार. आम्ही तर निशुल्क बोलत होतो. नगरपालिकेने सोसायटीला पत्र देऊन तुम्ही बदली करायला पाहीजे होते. आम्हाला त्याच्यात अर्ज देण्याची गरज नाही आहे.

**अनंत पाटील :-**

अध्यक्ष महोदय, तत्कालीन नगरपालिका असताना आपल्या नगरपालिकेतर्फे मुर्धा येथील गावात लाईन शिफ्टींग केल्या. आपण तेव्हा टेंडर पध्दतीने काही लोकांना सिमेंटची लाईन शिफ्टींग करुन दिले आहे. म्हणजे तिथे नागरीकांना कोणत्याही प्रकारचा भुदंड न सोसताना आपण सोय केलेली आहे. तशा त-हेचे टेंडर काढून महानगरपालिकेने काम केले तर नागरीकांना चांगला फायदा होऊ शकेल. कारण शिफ्टींग करताना सी.सी. पाईप लाईन हे आपल्यासाठी काढतोय. नागरीकांचा फायदा होणे आवश्यक आहे. या बद्दल पुन्हा विचार व्हावा.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब त्या ठरावावर सूचक म्हणून माझेच नाव आहे आणि असे ठरविले आहे जिथे सिमेटची पाईप लाईन आहे आणि ती जर बदलायची असेल व प्रशासनाला वाटले की, ती जुनी सिमेटची लाईन आहे, फुटलेली आहे आणि ती बदलून तथे नविन लाईन टाकायची आहे. हे सगळे जूने कनेक्शन नविन वर ट्रान्सफर करायचे असतिल तर पाचशे रुपये सरसकट आकारण्यात यावेत असा ठराव झालेला आहे. तर तो ठराव प्रशासनाने वेगळया पध्दतीने कसा काय घेतला? म्हणजे आम्ही ठराव करतो एक अणि लिहीले जाते ते वेगळेच.

**रिटा शाह :-**

साहेब आता जे वाचले ते शासनाचे आदेश आहे की, बायलॉज मध्ये आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सभापती साहेब, सन्मा. उपायुक्त साहेब, सर्व स्थायी समितीचे सदस्य आपण एका सभेमध्ये चर्चा केली होती. की, अशा विषेश एखादया विषयावर चर्चा करायची असेल तर तो विषय आपण सभागृहात सुरुवातीला सांगावा आणि त्याला चर्चा कारण प्रोसिडिंग व्यतिरीक्त आणलेला विषय तो विषय अतिशय महत्वाचा आहे. तर त्याच्यावर चर्चा स्थायी समितीच्या विषय पत्रिकेवरील विषय संपलेकी आपण त्याच्यावर चर्चा करावी. व त्या चर्चेत सर्व अधिकारी उपस्थित पाहीजेत. आपली आज सन्मा. मॉरस रॉड्रिक्स साहेब यांच्या उपस्थितीमध्ये पहिली सभा होत आहे आणि ही सभा स्वागताची गोष्ट अशी आहे की, ही सभा ठिक ११ वाजता सुरु होत आहे. आणि हा पायंडा पुढेही पडला पाहिजे. आपली पहिली तहकूब सभा आहे आणि तहकूब सभेवरती आपले काही तीन चार विषय आहेत. या विषयावर ती चर्चा झाली पाहिजे. पाण्याच्या विषया बाबत सर्व सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. मी तर म्हणतोय आपली जी ८१ एम.एल.डी. ची योजना होती त्या ८१ एम.एल.डी. योजनेतून आपणाला आतापर्यंत संपूर्ण पाणी मिळायला पाहिजे होते. परंतू आज आपल्याला किती पाणी मिळते याबाबत आपण अनभिज्ञ आहोत आणि ह्या विषयावर आपण ही सभा संपल्यावर तातडीने हया विषयावर आजच सभा घेऊन हयाविषयावर योग्य तो निर्णय घेऊ.

**शरद पाटील :-**

हा विषय आहे. आम्ही वेगळी चर्चा करीत नाही. हया विषयावर ठराव केला होता आणि जर त्या ठरावात बदल होत असेल तर स्थायी समितीमध्ये कशाला आणता.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब गेल्या सभेमध्ये असा निर्णय झाला होता. पाचशे रुपये सरसकट घेण्यात यावे आणि बाकी जो पाईपचा खर्च वगैरे आहे. तो संबधित नळ धारकांनी करावा. खडडा आणि बोरीग चार्जेसबाबत आपण काही घेण्याचे ठरवीले नव्हते. आणि ही बाब संबधितांना वगळण्यासाठी मी सुचवीत आहे आणि हा ठराव लगेच पुढच्या सभेत सादर करण्यात येत आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, पण हे जे लिहून आणले आहे ते कुठून लिहून आणले आहे. ते डिस्कशन होते की, गोषवारा होता की, काय आहे. हा ठराव कोणी केला आहे.

**प्र. सचिव :-**

हे इतिवृत्तांतातून फायनल झाले नाही. हा त्यांनी ठराव केलेला आहे.

**रिटा शाह :-**

पण डिर्पाटमेंट कुठे ठराव करते. त्यांनी गोषवारा बनवून आपल्या समोर आणलेला आहे की, ह्या विषयावर सन्मा. सदस्यांचे म्हणणे काय?

**एस. के. दशोरे :-**

मागच्या सभेला हा विषय चर्चेसाठी आला होता. तेव्हा स्थायी समितीमध्ये ह्या विषयावर एक तास चर्चा झालेली. बोरींग चार्जेस घ्यायचे नाही असा जर स्थायी समितीने आम्हाला आदेश दिला तर आम्ही बोरींग चार्जेस घेणार नाही.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, हा ठराव मागच्या सभेमध्ये झालेला आहे. ह्या ठरावाची अंमजबजावणी कधीपासुन होणार त्याला काही नियम आहेत का ?

**एस. के. दशोरे :-**

ठरावावर सही झाल्यानंतर अंमल बजावणी करणार आहोत.

**आसिफ शेख :-**

सही झाली नाही ती गाष्ट नंतरची आहे. सर्वसाधारणपणे आपण ठरावाची अंमलबजावणी कधी करतो.

**प्र. सचिव :-**

इतिवृतांत कायम केल्यावर ठरावाची अंमलबजावणी करतो. तसेच ठराव सभेत वाचुन दाखवल्यानंतर लगेचच कायम करु शकतो.

**आसिफ शेख :-**

आता पर्यंतचे जे आपले ठराव झालेले आहेत. त्याच्यावर सहया झालेले आहेत का? कारण एकदा असे झाले होती की, ठरावावर सहया नाहीत, इतिवृतांत गायब झालेले आहेत. असा प्रकार ह्या वेळी आहे का?

**प्र. सचिव :-**

ठराव, इतिवृतांत माझ्याकडे तयार आहेत व ज्या ठरावावर सहया घेतल्या आहेत ते सर्व ठराव माझ्याकडे आहेत.

**आसिफ शेख :-**

ठरावावर सही झाल्यानंतर इतिवृतांत झाल्यानंतर त्या ठरावाची अंमल बजावणी होते असे आहे का?

**प्र. सचिव :-**

होय .

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, दोन तीन दिवसापूर्वीची गोष्ट आहे. प्रशासनाने आम्हाला लिहून दिले आहे की, ८२ ग्रामपंचायत काळाची रजिस्टर मिळत नाही. हे योग्य आहे का? ७३ तें ८५ पर्यंतचे तुमच्याकडे रजिस्टर आहे आणि तुमच्याकडे मागच्या दोन वर्षाचे रजिस्टर नाही हे बरोबर आहे का ?

**मा. सभापती :-**

सन्मा सदस्य जो विषय चालू आहे त्या विषयावरच आपण चर्चा करावी व असे विषय आपण सभा संपल्यानंतर करु .

**रिटा शाह :-**

सभापती साहेब विषय नाही तरी मला बोलावेसे वाटते. सर्व डिपार्टमेंटचे अधिकारी हजर आहेत. टाउन प्लॅनिंगचा एकच अधिकारी येथे हजर आहे. डेपूटेशनवर किती अधिकारी आहेत व ते सभेत का हजर राहत नाही.

**मा. सभापती :-**

त्यांचा विषय विषयपत्रिकेवर जर असेल तर ते येतील.

**रिटा शाह :-**

विषय आहे असे नाही पण त्यांना सभेत यायला पाहीजे. समजा कोणता प्रश्न उद्‌भवला तर.

**मा. सभापती :-**

स्थायी समितीमध्ये जी चर्चा होते ती माझ्या अध्यक्षतेखाली होते आणि एखादा प्रश्न उद्‌भवला तर ती आहे त्या अधिकाऱ्याला विचारण्यासाठी.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सर्व खात्यांना सुचविण्यात येते की जे विभागप्रमुख आहेत त्यांनीच फक्त सभेला हजर रहावे आणि संबधितांनी आपल्या कार्यालयामध्ये उपस्थित रहावे. त्या विभागाचे सहाय्यक संचालक श्री. शेंडे साहेब येथे उपस्थित आहेत आणि जर आपल्याला दुसऱ्या अधिकाऱ्यांची उपस्थितता भासली तर त्यांना सभेत बोलवण्यात येईल.

**रिटा शाह :-**

बाकीच्या डिर्पाटमेंटच्या प्रमुखांना आपण हजर ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, हयाच्यामध्ये फक्त सी. आय. पाईप लाईन आहे. फक्त त्या सिमेंटच्या पाईप लाईनचा त्याच्यात उल्लेख करू नका. उदया जर सी. आय. पाईप लाईन डॅमेज झाली कुठे क्रॅक झाली व त्याच्यात घाण झाली तर त्या कामाला हा ठराव लागू पडणार नाही. फक्त प्रशासन सिमेंटच्या पाईप लाईन वर बोट ठेवेल आणि त्याच्यात परत निराळा कायदा लागेल. त्याकरीता ज्या ज्या जलवाहीन्या फुटतील व ज्या जलवाहीन्या फुटल्याने त्याच्यात दुषित पाणी मिसळू शकेल. माझी येथे ऐवढी सूचना आहे येथे जी सिमेंट पाईप लाईन दिले आहे त्याच्यात सी. आय. आणि सिमेंट दोन्ही टाका. कारण आपणच सांगाल की सी. आय. वर ठराव नाही. फक्त सिमेंट पाईप लाईनवर ठराव आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य आपला विषय असा होता विषय क्र. १३४ जुनी पाईप लाईन कायम स्वरुपी बंद करतेवेळी नळ जोडणी नविन पाईपवर स्थानांतरित करणे कामी आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत विचार विनिमय करणे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब सिमेंटचा उल्लेख आहे. म्हणून सी. आय. चा पण उल्लेख करा. सिमेंटच्या उल्लेख का केला मग ? आता आपणच वाचून दाखवीले ना.

**शरद पाटील :-**

कायम स्वरूपी बंद करत असाल तर.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब हा एक अत्यंत ज्वलंत विषय आहे. जे झोपडपटटी वासीयांना फोटोपास वितरीत करण्याची जी मोहीम आहे. त्यामध्ये आमच्या विभागातील दोन नावे जााणून बुजून वगळण्यात आले. ते नाव का वगळण्यात आले. याचा खुलाया पाहिजे. बाकीच्या लोकांची नावे लिस्टमध्ये आहेत. आमचे येथील लालबहादूर शास्त्रीनगर व नेहरू नगर यांचे नावे नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख हा विषय जो आहे तो प्रशासनाच्या अखत्यारीतील बाब आहे. आपण सभा संपल्यान ंतर आपण माझ्याकडे येऊ शकता. ह्या विषयावर आपण निर्णय घेऊ आणि सभागृहात जे विषय आहेत त्या विषयावर चर्चा करूया.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, कॉग्रेस पक्षातर्फे मी बोलू इच्छीते की, आमचे नवनिर्वाचीत सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स साहेब यांचे अभिनंदन करते की, पहिली आजची ही सभा ठिक ११.०० वाजता सुरू झाली व त्याचे सन्मा. सदस्य वैती साहेब ह्यांनी अभिनंदन केलेले आहे. ही माझी दुसरी स्थायी समितीची सभा

आहे आणि मा. महासभेमध्ये तर आपल्याला रुलिंग मिळतच नाही.  एक बोलतो त्याला रुलिंग मिळाली नाही तसे लगेच दुसरा बोलतो आणि त्यामध्ये कुणाचा विषय कुठे राहतो.  माझी सुचना आहे की, एक उठून बोलत असेल तर त्याला उत्तर मिळाल्याशिवाय दुसऱ्या सदस्याने बोलू नये व त्या सदस्याला उत्तर देण्याची जबाबदारी सभापती साहेब आपली आहे. आणि जेव्हा रुलिंग देण्याचा प्रश्न येणार तेव्हा आपणच रुलिंग दयावे अशी माझी आपणाला सुचना व विनंती आहे व आपण चांगल्या प्रकारे सभा चालवणार अशी आशा आहे.

**मा. सभापती :-**

प्रकरण  क्र. १३४ सदरच्या ठरावावर वाचन करून दुरूस्तीसह ठराव कायम करण्यात आला.

**प्रकरण क्र. १३४ :-**

जुनी पाईप लाईन कायम स्वरुपी बंद करतेवेळी नळ जोडणी नवीन पाईप लाईनवर स्थानांतरीत करणे कामी आकारणेंत येणाऱ्या शुल्का बाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. ११६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने महानगरपालिका हद्दीतील जुन्या सिमेंटच्या व बिडाच्या जलवाहिन्या कायम स्वरुपी बंद करते वेळी व जुन्या पाईप लाईनमधून गढूळ अथवा दुषित पाणी पुरवठा होत असल्यांस महानगरपालिका सदर जलवाहिनी कायम स्वरुपी बंद करीत असेल तर त्यावरील अस्तित्वातील नळ जोडणी नवीन जलवाहिन्यांवर स्थानांतरित करणेसाठी इतर चार्जेस न घेता नळ जोडणी स्थानांतरीत शुल्क सरसकट रु. ५००/- (रुपये पाचशे मात्र) प्रमाणे आकारुन नळ जोडणी स्थानांतरीत करणेंस मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.                    अनुमोदन :-  श्री. शरद पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३५चे वाचन केले.)

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेब आणि सर्व उपस्थित सन्मा. सदस्य आपणाकडे यापुर्वी नगरपालीकेकडून सर्वे करुन २००३-०४ मध्ये एकुण जाहीरात कर अर्थसंकल्पामध्ये निश्चित करण्यात आले होते. त्या अर्थसंकल्पामध्ये दर धरताना आपण त्यामध्ये दुकानावरील नाम फलक, दुकानावरील कंपनीचे जाहीरात फलक, वेदर शेड्स, शोकेस वरील जाहीरात आणि रुलिंग शटर वरील जाहीरात हे सर्व आपण पकडले होते.  परंतू ह्यामध्ये राज्य शासनाने नविन जी.आर. काढला तो जी.आर. दि. ९/७/०३ रोजी काढला. आणि ह्या प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने ठाणे महानगरपालिका प्रकरणामध्ये निर्णय दिला आणि त्या मध्ये वेदर शेड हे जाहीरात कर होऊ शकत नाही आणि दुसरे शोकेस हे देखील जाहीरातमध्ये येऊ शकत नाही असे त्याचे रुलिंग असल्यामुळे आणि शासनाच्या आदेशामध्ये सुध्दा ही अधिसूचना प्रसिध्द झाली त्यामध्ये वेदर शेड मधील जाहीरात त्यांनी गृहीत धरलेली नाही.  त्यामुळे आपल्याला जवळ जवळ ८८ लाख १९ हजार एवढी आर्थिक त्रुट जाहिरात करात येणार आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, ह्या विषयावर प्रत्येक नगरसेवकांनी सांगीतले की, प्रत्येक प्रभागात दुकान आहे आणि तेथे जाहिरातीचा बोर्ड लावल्यानंतर किंवा अधिक दुकानामध्ये डिसप्ले केला असेल तरी पण जाहिरात कर आकारत होतो आणि त्याबद्दल दुकानदारांच्या, नागरीकांच्या व ज्यांनी ज्यांनी फलक लावले आहेत त्यांच्यावरती बेसुमार जाहिरात कर लावल्यामूळे त्यांची तक्रार होती आणि आता जे नविन सुधारणा केल्यामुळे बजेट प्रोव्हिजनमध्ये आपल्याला ८८ लाख १९ हजार १३ रूपये एवढी त्रुट येणार आहे आणि जाहिरात कर वसुली मध्ये जी त्रुट येते जी घट येते ह्या घटीबाबत आपण शासनाने नविन राजपत्रामध्ये कर दाखविले आणि त्या करामध्ये समाविष्ट नसलेले म्हणजे शोकेस, वेदर शेड ह्याच्यावरील आकारणी रद्द करण्याकरीता तेवढीच एक संधी मिळाली.  आजच्या ह्या जाहिरात करात त्रुट येते त्या त्रुटीसाठी आजच्या ह्या सभेत मंजूरी दयावी आणि सदर बाब ही मा. महासभेपूढे घेण्यात

यावी आणि जी ही त्रुट येते त्यास मा. महासभेची मंजूरी घेण्यासाठी अहवाल पाठवावा अशी शिफारस करत आहे व त्याचबरोबर असा ठराव मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, ह्याच्यावर साधक बाधक चर्चा करावी. कारण ८८ लाख १९ हजार १३ रुपये आपण एवढी त्रुट दाखवतोय. ह्या विषयावर चार महिन्या अगोदर महापालिकेच्या मा. आयुक्त साहेबांना मी पत्रव्यवहार केलेला आहे. आपल्या शहारामध्ये सरसकट नाक्या नाक्यावर जिथे जागा दिसतेय तिथे दुकाने उघडली, इन्स्टीटयुट उघडली की भडक रंग लाल, गुलाबी असे भडक रंग ज्याला आपण रेडीयम कलर म्हणतो असे पोस्टर बेसुमार लावत चालले आहे. जो कुठला ज्याने दुकान काढली तर लावले पोस्टर त्याला गम असते स्टिक असते त्याचा पेपर लगेच डिस्ट्रॉय होत नाही. त्याला एक सिथेंटीक पेपर असतो. अशा प्रकारे जाहिराती आपल्याकडे बेसुमार वाढले आहे. आपल्याकडे जे ड्रामा थिएटर आहेत ती निरनिराळी वाढत आहेत, त्यांचे पोस्टर वाढत आहेत. मी सुचना अशी केली आहे की, जे पोस्टर आहेत त्याच्यावरचा ॲडरेस घेऊन त्या जाहिरातदाराला सरसकट दहा त वीस हजाराचे बील आकारून टाका आणि ते आकारले पाहिजे. कारण तुम्ही जर एकीकडे दुकानदारांना जाहीरात कर लावता तर तेही एक प्रकारे जाहीरातच झाली. आपल्या खांबावरती ज्यांनी ज्यांनी बोर्ड लावले, प्लॅस्टिकच्या पी.वी.सी. शीट लावले आहे. आता ठाणे महानगरपालिका वर्षाकरीता त्या कंपनीला भाड्याने देत असते आणि या शहरामध्ये कोणी छोटें स्टिकर जरी वाटले तरी तुम्ही त्यांना त्या ॲडरेसवर त्याची रक्कम पाठवा. आपले स्टीकर या शहरामध्ये एवढे एवढे वाटले गेले आहेत असे आम्हाला आढळले आहे. नगरपालिका अधिनियमानुसार आम्ही तुम्हाला हे बिल आकारत आहोत. यामध्ये ही जी त्रुट दाखवीली आहे मागच्या सभेमध्ये हजर होतो स्वतः. त्याच्यावरती इतिवृतांतामध्ये माझे स्टेटमेंट ही असेल शहरामध्ये जेव्हा हा सर्वे झाला त्यावेळी अनेक ठिकाणी माहीती पडले की, आता आपल्या दुकानाचा सर्वे होणार आहे तर अनेक ठिकाणी मोठी मोठी होर्डिग्ज काढण्यात आली व सर्वे झाल्यानंतर तो परत तिथे होर्डिग्ज लावून टाकायचा हे प्रकार आपल्याकडे झालेले आहेत. त्याकरीता मागच्या वेळेला आमची सुचना अशी होती की, आपण एक ठरावीक फॉर्म बनवा व तुमचा सर्वे झाल्याबरोबर लगेच त्या दुकानदाराची सही घ्या किंवा विरोध असला तरीही तुम्ही तसे नोंदवून त्याची सही घ्या. माझी ॲडव्हरटाईज इतके बाय इतके झालेली आहे आणि ही साईज मला मान्य आहे. व त्याची संमती असेल तर त्याची सही घ्या तसेच माझ्या दुकानावर जो माणूस आला होता सर्वे करायला त्याने माझ्याशी रे तु ची भाषा केली. म्हणजे मी नगरसेवक आहे असे त्याला सांगीतले नाही. आपण जी आकारणी करु त्याच्यावरती ऑबजेक्शन नाही आले पाहिजे आणि रिन्यु करण्याकरीता सभापतींनी मागच्या वेळेला रुलींग केले आहे की, हा सर्वे परत होणार आहे. सन्मा. मोहन पाटील ह्यांनी रिन्यु करण्याचा आदेश दिला होता. ते आदेश असला कारणाने मी सुचना सांगतो त्या शहरामध्ये टीम वर्क तयार करा व त्यांचा आपण पहिल्यांदा अहवाल मागवा व आमचा ही आम्ही अहवाल देवू. सभापती महोदय, जाहीरातीचा विषय आला आहे म्हणून सांगतोय शहारामध्ये एस्सेल वर्ल्ड पर्यंतच्या ज्या बत्या आहेत, काशिमिरा रोडवर ज्या लागतील त्या आणि ज्या आहेत त्या पोलवरती तुम्ही दांन बॅनर साधारणः तीन बाय दोनचे तुम्ही ॲलॉट करा. एक पोलचे आपले भाडे बी.एस.ई.एस.कडून रिकव्हर होण्याची शक्यता आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़ो.) :-**

बी. एस. ई. एस. पोलवर जाहिरात लावायचे दिले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग ती रक्कम ह्याच्यातुन डिडक्ट होईल. आपण जाहिरातीचा ठराव घेतला आहे आणि तुम्ही आता सांगितले की, ८८ लाख १९ हजार त्रुट होत आहे. बी.एस.ई.एस.च्या पोलमधून जाहिरातीचे मिळणारे भाडे ते ह्याच्यात ॲड होणार.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़ो) :-**

सन्मा. सदस्य साहेब हा जो गोषवारा आहे त्याच्यामध्ये फक्त दुकानावरील जाहिरात लावले जातात.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब आपण विषय काय मांडला आहे. विषय असा आहे, जाहिरात कर घटीबाबत त्याच्यावर लिहिले आहे का? होर्डींग्ज किंवा शोकेस लिहिलेले नाही. विषय आपला संक्षिप्त आहे. त्याच्यामध्ये जर तुम्ही ॲड केले तर बिघडेल का? मी चुकीचे बोलतोय का?

**अजित पाटील :-**

सन २००२-०३ मध्ये ठराव झाला होता. सर्व दुकानदारांना जाहिरात कर लावायचा निर्णय घेतला होता. त्यानुसार १ कोटी २७ लाखाचे आपण संबंधितांना बिले पाठविली होती. या बिलामध्ये शोकेस आणि वेदर शेड वरती जवळ ८८ लाखाचा समावेश होता. त्या बिलामध्ये नागरिकांच्या तक्रारी आल्या होत्या. त्या तक्रारी आल्यानंतर शासनाने ९ जून, २००३ साली परिपत्रक काढले आणि जाहिरात कर कशा पद्धतीने आकारायचे त्याबद्दल गाईडलाईन दिले आहे. त्या गाईड लाईनमध्ये वेदर शेड आणि शोकेसचा समावेश नाही आहे आणि आपण जे शोकेसवर आणि वेदर शेडवर आपण जी रक्कम आकारली आहे त्याची व्हॅल्यू ८८ लाख रुपये आपल्याला वजा करावी लागेल. जी १ कोटी २७ लाखामधून ८८ लाख रुपये वगळावी लागेल म्हणून शासनाच्या नियमाप्रमाणे आपण लावू शकत नाही. ८८ लाखाची जी त्रुट होणार आहे त्याला मंजुरी आवश्यक आहे आणि ती रक्कम बजेटमध्ये समाविष्ट केलेली आहे. ८८ लाखाची आपल्याला त्रुट येणार आहे. त्याकरिता सभागृहाची मंजुरी मागितलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

टी.एम.सी.ला आपण नवी मुंबईला वाशीला जातो तेव्हा त्या बत्तीच्या खांब्याला रिलाईन्सचे ग्लोसाईनचे बोर्ड असतात त्याला आपण काय म्हणाल मग? साहेब माझे म्हणणे एवढेच आहे. आपण जो जाहिरातीचा विषय घेतला आहे, त्याच्यात तुम्ही जी बत्तीची ॲड केली त्या रक्कमेचा उल्लेख पाहिजे की, जाहिराती पोटी बत्त्यांमार्फत एवढी रक्कम मिळणार आहे. हे तुम्ही गोषवाऱ्यात दिले आहे. ते जर तुम्ही ठरावात घेत असाल तर ह्या विश्लेषणापोटी जर का एखाद्या कंपनीने शंभर फुगे सोडले तर ते ही तुम्ही ह्याच्यामध्ये इन्क्लुड केले पाहिजे आणि आपण मेन्शन करा की, बी.एस.ई.एस.कडून आपल्याला एवढी एवढी रक्कम अपेक्षित आहे.

**अजित पाटील :-**

परवानगी दिल्यानंतर आपण भाडे लावणार आहोत. बी.एस.ई.एस. परवानगी देत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

बी.एस.ई.एस. का परवानगी देत नाही. तुम्ही आपला ठराव करा. बी.एस.ई.एस. परवानगी देईल तेव्हा देईल. आपण लावायला सुरुवात करायची. त्यांनी काढले तर बघता येईल, काय करता येईल ते. आपण साडेसातशे रुपये दरमहा भरतो म्हणजे मालकी हक्क आपला आहे. त्यांनी फक्त मेन्टेनन्स करायचे आहे. मुंबईला ते लोक अलाऊड नाही करत का?

**संजय दोंदे :-**

मुंबईला बी.एस.ई.एस.ने अलाऊड केलेले नाही, एम.एस.ई.बी.ने अलाऊड केले आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब आपण जी भावना व्यक्त केली आहे आणि माझे मत असे आहे की, हे जे बेस्टचे पोल आहेत त्याचे चार्जेस आपण भरत असतो आणि सभेमध्ये त्यांना स्पष्ट कल्पना देखील दिलेली आहे आणि अशा तऱ्हेचे बोर्ड आपण लावावे. प्रशासनाला माझी विनंती आहे की, त्यांनी लवकरात लवकर असे बोर्ड लावावे आणि बोर्ड लावल्यानंतर काढण्याची त्यांच्यामार्फत जर नोटीस आली तर त्यांच्या विरुद्ध हायकोर्टात जावे, कोर्टामध्ये जावे आणि रितसर कायदेशीर कार्यवाही करावे. बी.एस.ई.एस.चा हा नेहमीचा मुद्दा सोडायचे कारण की, मी आम्ही ह्या मताशी सहमत आहोत की, मालक आपण आहोत. पैसे आपण चार्जेस भरतो त्या पोलचे आणि ते म्हणतात की, आपण त्या पोलवर पोस्टर लावू नका. हे म्हणणे संयुक्तिक नाही आहे आणि आपण त्यांना आपली भावना समजावून सांगितलेली आहे. आपले मत त्यांना समजावून सांगितले आहे. हा विषय आता आपल्याला वाढवायचा नाही. लवकरात लवकर तुम्ही ह्याचा निर्णय घ्या. बोर्ड लावण्याची कार्यवाही करावी. त्यांनी बोर्ड काढल्यानंतर पालिसमध्ये गुन्हा दाखल करा आणि कायदेशीर जी कार्यवाही करायची आहे ती कार्यवाही आपण करावी.

**मिलन म्हात्रे :-**

आज बत्तीवर जी जाहिरात आहे त्या फुकटच्या अजून चालू आहेत आणि ह्याची अपेक्षित रक्कम किती आहे? बी.एस.ई.एस.चे शहरातले खांब किती आहेत?

**संजय दोंदे :-**

पाच लाखाला वार्षिक टेंडर दिले आहे.

**अजित पाटील :-**

एक कोटी सत्तावीस लाख डिमान्डची बिले गेली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जर घटीबाबत विचार करतोय आणि एवढी त्रुट येणार आहे. मग ही घट आहे ह्याच्यामध्ये काय केले तर भरपाई होईल आणि आता आपण आम्हांला माहिती दिल्यावर कळले की, बी.एस.ई.एस. परमिशन देत नाही. आपल्याच बत्यांवर आम्ही पोस्टर लावू शकत नाही. त्यानंतर टेंडर दिले गेले नाही त्याला आपण अजुन फुलफिल केलेले नाही. तो टेंडरवाला जर कोर्टात गेला तर आपण त्याला काय उत्तर देणार?

**मा. सभापती :-**

मिलन म्हात्रे साहेब पुढच्या जाहिर सभेत टाटाच्या अधिकाऱ्यांना बोलावून घेऊ. दर महिन्याला पंधरा ते वीस लाखाचा नफा होणार असे घोषित केले होते. परंतु ह्याला कोणी काहीच उत्तर दिले नाही किंवा त्यांना बोलावले नाही. आता त्यांचे सर्व लाईटचे पोल पडले आहेत. त्याला आपण नवीन पोल टाकायला आपण टाटावाल्यांना बोलावून जाहिर सभेत त्यांना आपण निर्णय देऊ या.

**मिलन म्हात्रे :-**

शहरामध्ये आपण होर्डीग्ज भाड्याने दिलेले आहे. लोकांचे पैसे घेतले आहेत आणि अजून त्यांना साईड फिक्स करुन दिलेले नाही. सुभाषचंद्र बोस मैदानावर तुमची दोन होर्डिंग्ज लागली आणि तो माणूस होर्डीग्ज कसे लावतो त्याच्यावर तुमचे लक्ष आहे का? श्री. वाजपेयी साहेब आले असतांना ते होर्डीग्ज पडले एक तास अगोदर आणि शहरात एका वेळेला दोन होर्डीग्ज पडल्या. उद्या जर एखादा माणूस मेला तर त्याला जिम्मेदार कोण? माझा सांगायचा दृष्टीकोन साहेब असा आहे, आपण एखाद्या व्यक्तीकडून पैसे घेतले तर नगरपालिकेची देखील काही तरी लायबलेटी आहे. आता रेल्वेच्या येथे मोठमोठ्या होर्डीग्ज बांधल्या आहेत. सोसाट्याचा वारा सुटतो, पब्लिक खाली उभी असते, तिथे मच्छीबाजार आहे, भाजी मार्केट आहे, आपण कल्पना केली आहे का ती होर्डीग्ज कशी लावली आहे? त्यांना वाटले तशी स्वस्तातील होर्डीग्ज त्यांनी लावले. मागच्या वेळेला जेव्हा वाजपेयी साहेब आले होते ते होर्डीग्ज रस्त्यावर कोसळली. केळकर साहेब त्यावेळेला तुम्ही तिथे नव्हता. माझा सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, आपल्याकडे कोण सक्षम अधिकारी आहे का ते होर्डीग्ज कुठे लावले, कसे लावले ते पाहण्यासाठी? कारण आपण त्यांच्याकडून पैसे घेतो.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, ह्या विषयावर ज्या भावना व्यक्त केल्या जात आहेत आणि आपल्याला ८८ लाख १९ हजार एवढी त्रुट येत आहे. त्याला स्थायी समिती कशी जबाबदार राहणार. ह्या विषयावर विस्तृत अभ्यास होऊ द्या आणि विषय पुढच्या सभेत घ्या.

**धनराज अग्रवाल :-**

हा विषय तीनदा झाला आहे. शासनाने आणि कोर्टाने निर्णय घेतला आहे आणि एवढी त्रुटी कशी भरायची आहे हे मा. महासभेला ठरवू द्या.

**आसिफ शेख :-**

त्रुटी भरून काढायचा मार्ग काय आहे त्याचा खुलासा प्रशासनाने करावा.

**मिलन म्हात्रे :-**

आपण दर वेळेला इतर महानगरपालिकेंची उदाहरणे घेतो. ठाणे महानगरपालिकेने तिकडचे कॉर्नर्स शहरांच्या दिशा, वस्त्या मार्गदर्शक मोठे ग्लोसाईनचे बोर्ड तयार केले. त्याला स्पॉन्सरर पकडले आहेत. त्या लोकांनी प्रत्येक नाक्यावर, प्रत्येक कोपऱ्यावर त्यांचे बोर्ड लागलेले आहेत. पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला सुद्धा ह्या पद्धती आहेत. आपण आपल्या शहरामध्ये सर्व्हे करुन काही कॉर्नर्स स्पॉन्सरांना दिले तर त्याच्यातून आपण काही रक्कम उभी करु शकतो जे भिवंडी, कल्याण, ठाणे महानगरपालिका, पिंपरी, चिंचवड महानगरपालिका ह्यांनी जी प्रोसिजर ॲडॉप्ट केली आहे ती प्रोसीजर करता येईल का? ते आपण बघा. वर्टीकल, हॉरीझोन्टल आठ दहा फुटाचे बोर्ड असतात. त्याला ग्लोसाईन फिलींग लावून वरील स्पॉन्सरचे नांव असते. तसे करता आले तर बघा. ह्याच्यामध्ये माझी ही सुचना आहे आणि आपण जो मागे सभापतींनी ह्या विषयावर पुन्हा सर्वे होणार. पुर्नवलोकन होणार अशी रुलिंग दिली होती. आम्हांला त्या डिपार्टमेंटच्या प्रमुखांकडून इंशुरन्स पाहिले की सदर कामी खाजगी एजन्सीकडून संपूर्ण कामाचा सर्व्हे करुन २००३ या आर्थिक वर्षात दोन कोटी हा जो सर्व्हे करुन झाला आहे. ठरावाची दुसरी लाईन त्याच्यामध्ये

सभापतीनी पुर्नवलोकन सांगितले आहे. त्याचा उल्लेख नाही आहे. ह्याच्यामध्ये जुन्या सभापतींचे ह्या सभागृहात जे रुलिंग झाले होते त्याचे रिफ्लेक्शन कुठेही नाही.

**अजित पाटील :-**

आकारणी झालेली आहे. चुकीची आकारणी आहे ती रद्द करण्यासाठी सभागृहाचा ठराव आवश्यक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण सभापतींनी सांगितले आहे हा सर्व्हे चुकीचा असल्यामुळे त्या एजन्सीची ती चुक आहे आणि परत आपल्याला ती रिन्यु त्यांच्याकडूनच करुन घ्यायचे आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य आपली जी आकारणी सन २००३-०४ मध्ये केलेली आहे आणि आता आपण जर ह्याच्यामध्ये सर्व्हे करायला गेलो तर ह्यामध्ये बराच कालावधी जाणार आहे आणि हा कालावधी गेला तर आपली जी वसुली आहे ती बाकी राहणार म्हणून ज्या दुकानामध्ये आम्ही बिल दिल्यानंतर त्याला आक्षेप घेण्याचा हरकत घेण्याचा अधिकार पंधरा दिवसाच्या आत आहे. पण ज्या कोणाला जास्त बिल वाटली तो व्यापारी आपल्याकडे लेखी अर्ज देऊ शकतो. त्याचा सर्व्हे आपण करुन घेऊ आणि त्यामध्ये जर नियमाप्रमाणे सर्व्हे झाल्यानंतर ज्यामध्ये आवश्यक असेल, खरोखरच जास्त बिल झाले असेल. त्या तक्रारीप्रमाणे त्याची दखल घेऊन दुरुस्ती करण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब आतापर्यंत किती तक्रारी आल्या आणि किती तक्रारींचे निवारण झाले आहे.

**शरद पाटील :-**

वेदर शेड किंवा शोकेसचे बिल लावले आहे. ते कमी करायला लागेल. हरकती येवो किंवा न येवो.

**अजित पाटील :-**

त्याचाच प्रस्ताव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ज्यावेळेला आकारणी केली त्यावेळी हरकती घेण्यासाठी तुम्ही जो कालावधी दिला त्यानंतर वीथ टाईममध्ये हरकती आल्या त्या किती? आणि तुम्ही त्याचे रिडक्शन केले का? कारण कसे आहे मी स्वतः दोन तीन माणसे पाठविली आहेत. ह्यांनी त्यांना विजय पाटलांकडे पाठविले, विजय पाटलांनी परत ह्यांच्याकडे पाठविले आणि ती माणसे त्यांच्याकडे गेल्यावर ते म्हणतात माझ्याकडे पावर्स नाही.

**अजित पाटील :-**

घरपट्टी जशी कमी जास्त करतो त्याप्रमाणे हे कमी करुन घेऊ.

**मिलन म्हात्रे :-**

समोरच्या माणसाने पंधरा दिवसामध्ये तक्रार केली पाहिजे त्याचे निवारण करण्यासाठी काय टाईम पिरीयड आहे का नाही? मी स्वतः माणसे पाठविली आहेत. त्यांनी नाही म्हणून सांगू दे. त्या व्यापाऱ्याला मी उद्या उभा करतो आणि तुमच्याकडे तक्रार निवारण करणारा कोणी अधिकारी आहे का? तक्रार निवारण निर्णय घेणारा अधिकारी कोण? आपण आम्हांला त्यांचे नांव द्या.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य गेल्या वेळेस नागरिंकांच्या भावना अत्यंत तीव्र होत्या. ते जास्त टॅक्स लावण्यांत आल्यामुळे व हे बिल दिल्यानंतर हे जाहिरात कर भरलेले नाही. त्याची एक टक्के एवढी वसुली गेल्यावर्षी झालेली आहे. तीच वेळ यावर्षी सुद्धा येऊ नये म्हणून यावर्षी आम्ही बिल देऊ आणि बिल दिल्यानंतर त्या ज्या तक्रारी येणार त्या तक्रारी वेळच्या वेळी डिसाईड करण्यासाठी त्याची संपूर्ण जबाबदारी अजित पाटील यांच्याकडे देण्यांत आली आहे व कर विभागाचा ह्याच्याशी काही एक संबंध नाही आणि जाहिरात कर हा स्वतंत्र विभाग राहील आणि त्याची वेळीच दखल घेण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

८८ लाखावर बोलतो आणि आपण बोललात एक टक्का वसुली झाली आहे. म्हणजे १ कोटी २७ लाखाची वसुली न होण्यासाठी त्याला कारणीभूत असणारा अधिकारी कोण? हे प्रशासनाला व आयुक्त साहेबांना निदर्शनास आणू दिली पाहिजे की, बजेट कोलमडतोय. हा सव्वा कोटीचा फरक

आहे. वैती साहेब व्यापारी लोक येऊन त्यांना असे टोलवाटोलवीचे धंदे चालले आहेत. एकही अधिकारी फिक्स नाही की, ही ॲथोरिटी त्यांच्याकडे आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मिलन म्हात्रे साहेब, ८८ लाखाची ही जी तुट आहे. आपण याच्यामध्ये वेदर शेडला किती आकारणी केली आहे ते बघा. वेदर शेडसाठी आपण ७२ लाख ४६ हजाराची आकारणी केली आहे. वेदर शेडचा अर्थ असा होता की, पावसाळ्यामध्ये पावसापासून संरक्षण करण्यासाठी जे शेड बांधले तर त्याच्यावर कर आकारणी झाली आणि ७२ लाख ४६ हजार हे त्याच्यातून जवळ जवळ नष्ट झाले. आपण एवढा टॅक्स लावल्याबरोबर त्या त्या दुकानदारांनी त्या त्या एजन्सीने आपले वेदर शेड रद्द करतोय आणि मागच्या वेळी फक्त दोन फुटाचे शेड ठेवतोय अशा सुचना मांडल्या की, आम्ही प्लास्टीक लावू म्हणून आपल्याला एवढी मोठी जी त्रुट दिसतेय ३८ लाखाची ती केवळ ह्या ७२ लाखामुळे एवढा मोठा फरक दिसतोय.

**आसिफ शेख :-**

आपल्याला शासनाचे स्पष्ट आदेश आहे की, वेदर शेडला जाहिरात कर लावायचे नाही. मग आपण येथे चर्चा कशाला करतोय. हा विषय येथेच संपवून टाका.

**चंद्रकांत वैती :-**

मिलन म्हात्रे साहेब महासभेत गेल्यानंतर तुम्ही ज्याप्रमाणे सांगितले की, काही कॉनर्समध्ये डिस्प्ले करायचे किंवा जाहिराती करायच्या. आपण हे जे कार्यक्षमतेने कारभार करायचे घेतले होते ते टेंडर देखील घेतले. परंतु आजपर्यंत ते ठेकेदार पोलवरती कुठल्याही प्रकारचे जाहिरात करु शकले नाही. शांती नगरमध्ये मी स्वतः जाऊन त्या शांती स्टारच्या डायरेक्टर लोकांशी जाऊन बोललो होतो. त्यानंतर प्रशासनामध्ये त्यांच्यामध्ये जवळ जवळ सलोखा होत चालला आहे. त्याच्यामुळे तोही प्रश्न मिटेल आणि ह्याच्यामध्ये जी त्रुट येते ही वेदर शेडमुळे एवढा मोठी ही त्रुट आपल्याला दिसते. तर हा मा. महासभेपुढे विषय घेतांना जाहिरातीसाठी जाहिरात कराचे आणखी उत्पन्न वाढीसाठी नवीन मार्ग शोधणेबाबत विचारविनिमय व्हावा आणि हा ठराव मा. महासभेपुढे पाठविण्यांत येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब मला आणखीन एक उपसुचना करायची आहे. आपल्या शहरामध्ये आता एखादे दुकान आहे किंवा एखादे फिक्सींग वॉल आहे. त्या फिक्सींग वॉलवरती प्लास्टर केलेले असते. कोणती तरी कंपनी येते सरसकट ऑईल पेंट मारुन आपली जाहिरात करुन निघून जातात. असे प्रकार फार मोठ्या प्रमाणात चालू आहे. म्हणजे मी दुकान बंद केल्यावर रात्री पेंटर येऊन कलर मारतो आणि कॅडबरी लिहून निघून जातो आणि तुम्ही जे कर आकारणार आहात. आठ बाय दहाचे त्यांचे पैसे मला भरायला लागणार आहेत. आपण ह्याचे सर्व्हे लगेच केले पाहिजे. मेजनमेन्ट घ्या, क्षेत्रफळ काढा. एकेका कंपनीचे तुम्ही सिनॉ बसेस तयार करा. कॅडबरीच्या किती जाहिराती आहेत ते त्या कॅडबरीला पाठवून द्या. आमच्या शहरामध्ये एवढ्या लाखाची तुमची ॲडव्हरटाईजमेंट झालेली आहे आणि कॉमन प्लेस तुम्ही लावले आहे. त्यामुळे मालक कोणी नाही. तुम्ही त्यांचे देणेदार लागताहेत. आता समजा एखादी कॉमन भिंत आहे, पोलिस स्टेशनची भिंत आहे, नगरपालिकेच्या कंपाऊंडची भिंत आहे आणि त्याच्यावर ते कॅडबरी लिहून निघून गेले तर तुम्ही वसुली कुठून करणार. त्या कंपनीचे ऑफीसचे ॲड्रेस व त्याचा डिलर कोण असेल त्याला तुम्ही पकडा आणि त्याच्याकडून तुम्ही ते जाहिरातीचे पैसे वसुल करा.

**मा. सभापती :-**

त्याच्यावरती घरमालकाचा हक्क असतो. त्यांनी त्यांना बंधन करायला पाहिजे. मुंबईमध्ये असे लिहिलेले असते की, कोणीही रात्रीच्या वेळी बोर्ड किंवा जाहिरात केल्यावर पोलिस केस करण्यांत येईल. तशी पोलिस केस करु शकतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्यांना जाहिरातीचे कर पाठवा.

**मा. सभापती :-**

पण ते एक्सपेक्ट करणार नाही.

**चंद्रकांत वैती :-**

असे केल्याने ते अशा प्रकारचे जाहिरात करणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी एक्सपेक्ट केले नाही, तरी असे प्रकार बंद तरी होतील.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, तसे वास्तविक होत नाही. महानगरपालिकेचा एरिया आहे त्याच्यात जे करतात ते बरोबर आहे आणि दुकानाला करतात ते दुकानदाराला विचारुन करतात. तुम्ही फुकटमध्ये येथे पेन्ट करतोय व तिथे नुसरते कॅडबरी असे लिहिणार आहे. तर पेन्ट करु का? तर दुकानदार करायला परवानगी देतात. म्हणून ते करतात. ते प्रायव्हेट असेल आणि जसे म्हात्रे यांनी सांगितले भिंतीचे असेल तर ते ठिक आहे. प्रायव्हेट मालकीच्या दुकानावर ज्यांनी पोस्टर लावले असेल तर त्याच्यार तुम्ही कर आकारणार काय?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

पोस्टर लावले, स्टीकल लावले ते कर त्या कंपनीला लागणार.

**रिटा शाह :-**

साहेब मी पॉलिटीकल असून सांगते की, जागे जागेवर आम्ही होर्डिंग्ज लावले. त्याच्याबद्दल देखील आपण क्लिअर करा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्यांनी आता भावनाप्रधान प्रश्न उपस्थित केला. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला आणि आपण राष्ट्रपुरुष म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना मानतो. त्यांच्यासमोर आजच्या तारखेला केवढे मोठे होर्डिंग्ज लावले आहे. ही आपली सन्मा. सदस्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. होर्डिंग्ज जे लावले आहे त्यामुळे शिवाजी महाराजांचा पुतळा दिसत नाही. सन्मा. सदस्यांना माझी विनंती व सर्व गटनेत्यांना माझी विनंती आहे की, आपण ह्या विषयावर गटनेत्यांची सभा बोलवा आणि राष्ट्रपुरुषाचा अपमान होणार नाही असे कोणतेही कृत्य करु नये अशी सर्व गटनेत्यांना विनंती सभा घेऊन करावी.

**रिटा शाह :-**

साहेब माझा प्रश्न असा आहे की, अमुक अमुक समाज सेवक भाईंदरमध्ये राहायला आले आणि आज तो समाज सेवक झाला व त्यानं लगेच पोस्टल लावले, बॅनर लावले. तर त्याला आपण जाहिरात कर लावणार का नाही? पॉलिटीकल पार्टीला सुद्धा मग कोणीही असो त्याच्यात मीसुद्धा असेन. त्यांनी असे बोर्ड, बॅनर लावल्यावर त्यांना जाहिरात कर लागणार का नाही असा प्रश्न मी येथे विचारला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे नगरपालिकेचे ऑफिस आहे का तमाशाचे थिएटर आहे त्याचे उत्तर आपण मला द्या. याच्यापेक्षा आमच्या पक्षाचे चांगले होर्डिंग्ज आम्ही लावू शकतो.

**रिटा शाह :-**

नियम हे आपण सर्वांसाठी सारखेच असू द्या.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

राजकीय, सामाजिक संस्थांच्या सर्व बॅनर्सला, होर्डिंग्जला आपण सुधारित करतो.

**मिलन म्हात्रे :-**

ज्या होर्डिंग्जची आठ हजार रुपये किंमत होते त्याला तुम्ही आठशे रुपये भाडे लावा ना. आठ हजार रुपये जर तो खर्च करतो तर तो तुम्हांला आठशे रुपये का नाही देणार. आठशेची पावती फाडली पाहिजे.

**अनंत पाटील :-**

अध्यक्ष महोदय, या संदर्भात जो प्रश्न उपस्थित केलेला आहे ह्याच्या संदर्भात आपण प्रशासकीय अधिकारी असतांना नगरपालिकेच्या समोर असे प्रकार होत असेल तर प्रशासनाची जबाबदारी काय? काशिमिरा येथे असलेल्या शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर बॅनर लावले जातात आणि शिवाजी महाराजांचा पुतळा झाकला जातो.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य ह्याबाबत राजकीय पक्षाशी चर्चा झालेली आहे आणि याबाबत लवकरात लवकर मी येथे सभापती साहेबांना विनंती करतो की, आपण गटनेत्यांची बैठक बोलवावी आणि हा विषय अत्यंत

ज्वलंत असा विषय आहे आणि सभापती साहेबांनी निर्देश दिल्यानंतर या शहरामध्ये राजकीय, सामाजिक असो किंवा कोणत्याही संस्थेचे बोर्ड असो आम्ही ते काढण्याकरिता मागे कचरणार नाही.

**रिटा शाह :-**

साहेब माझी अशी सुचना आहे, आपली महानगरपालिकेची वास्तु जिथे जिथे आहे. जिथे आपला पुतळा आहे आणि जे आपण शहराच्या सुशोभिकरण करण्यासाठी करतो तिथे तिथे बॅन्ड करा. तिथे काहीच लावायचे नाही आणि जे लावणार त्यांच्यावर तुम्ही पॅनल्टी लावा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

ह्याच्यावर आपण निर्णय घेऊ. आपण तिथे बोर्ड लावलेला आहे तरी तिथे बॅनर लावतात.

**शरद पाटील :-**

सभापती साहेब पहिले एकदा असे झाले होते. सर्व बॅनर काढण्यांत आले होते. जेव्हा भाजपाचा बॅनर लागला तेव्हा सगळे बॅनर काढण्यांत आले होते. पण आता परत तिथे बॅनर लावण्यांत येत आहे हा दुजाभाव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाने आतापर्यंत कायदेशीर कार्यवाही काय केली? तुमच्यावर राजकीय दबाव येतो का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण गटनेत्यांची बैठक घेऊन त्या गटनेत्यांना समजावून सांगू की अशा त-हेचा बोर्ड तुम्हीच लावू नका.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाला जर कोण ऐकत नसेल तर आम्हांला कोर्टाकडून रितसर ऑर्डर आणावी लागेल.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य प्रशासनामध्ये नगरसेवक हे ही प्रशासन आहे आणि ह्यामध्ये जबाबदार नगरसेवक आहेत कारण की, छत्रपती शिवाजी महाराज हे प्रशासनापुरते मर्यादित नाही त्यांना महाराष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण भारताचे कुलदैवत त्यांना मानतो आणि त्यांची अशी अवमानता होत असेल तर आपण ते महाराष्ट्राने सहन करायचे का?

**अनंत पाटील :-**

आमची अशी समज होती की, प्रशासनाकडून परवागीन घेऊनच असे बॅनर्स लावले जातात.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब ह्या विषयावर आपली रुलिंग येऊ द्या की, सर्व गटनेत्यांची बैठक तातडीने बोलावण्यांत येईल व त्याच्यावर निर्णय घेण्यांत येईल.

**रिटा शाह :-**

साहेब गटनेत्यांची बैठक घेणार हे बरोबर आहे. पण स्थायी समितीचे काहीतरी वजुद आहे. स्थायी समितीमध्ये आपण सुचना केली. ठराव मांडला ते मान्य करणार की, गटनेत्यांनी बोललेले मान्य करणार. तुम्ही गटनेत्यांची सभा आधी बोलावून नंतर हा विषय आणला पाहिजे होता.

**मा. सभापती :-**

पहिल्या सभेमध्ये गटनेत्यांची सभा बोलावणार व दुस-या आठवड्यात स्थायी समितीमध्ये सदरचा विषय येणार आहे.

**प्रकरण क्र. १३५ :-**

जाहिरात कर वसुलीत येणा-या घटीबाबत.

**ठराव क्र. ११८ :-**

मिरा भाईंदर महानगरपलिकेने सन २००२-०३ या आर्थिक वर्षात संपूर्ण शहराचा सर्वे करुन जाहीरात करापोटी अंदाजे रुपये दोन कोटी उत्पन्नाची तरतुद निश्चित केली होती त्या नुसार महापालिकेने वसुली करणेंस सुरु केले होते. परंतु दि. ०९/०६/२००३ रोजी प्रसिद्ध झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे रजिस्टर्ड नं. टी.ई.सी.एच./४७-३०३/एम.बी.आय./२००३-०५ मध्ये अधीसुचना क्र. २ मधील व्याख्या २ नुसार जाहिरात कराचा अर्थ - शब्द, अक्षरे, प्रतिमाने कोणत्याही साधनांचा किंवा भिती पत्रकाच्या सहाय्याने खुण करणे, जाहिरातफलक, फलक, तात्पुरत्या कमानी रोषणाई केलेले चिन्ह, नामफलक फुगे इत्यादी द्वारे केलेली घोषणा इत्यादीचा समावेश केला आहे. सदर राजपत्रात शोकेश व वेदर शेड यांवर जाहिरातकर आकारण्याबाबत उल्लेख केलेला दिसून येत नाही. त्यामुळे सन २००२-०३ या आर्थिक वर्षातील शोकेश व वेदर शेड वरील जाहिरात कर रद्द

केल्यास सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील अंदाज पत्रकात निश्चित केलेल्या रक्कम पेक्षा अंदाज रक्कम रुपये ८८,१९,०१३/- एवढी तुट येणार आहे.

सबब शासनाच्या वरील नमुद केलेल्या राजपत्रात जाहिरात कर मध्ये समाविष्ठ नसलेले (शोकेश व वेदर शेड) यावर केलेली आकारणी रद्द करण्यांस व येणारी रक्कम रुपये ८८,१९,०१३/- घट धरण्यांस ही स्थायी समिती मंजुरी देत आहे. तसेच २००३-०४ वर्षासाठी वेदरशेड व शोकेश यावरील आकारणी रद्द करण्यांत यावी. उर्वरित बाबींवर मंजुरी दिलेल्या दराप्रमाणे आकारणी करणेंस ही सभा मा. महासभेस शिफारस करीत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती. अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३६ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, पाणी विभागातर्फे आतापर्यंत लाखो रुपयांचे टेंडर पाण्याच्या पाईपलाईन बद्दल आले. ह्याच्या अगोदर त्याला आम्ही मंजुरी सुद्धा दिली परंतु आजच्या तारखेला पाणी विभागामध्ये गेल्या दोन अडीच वर्षापासुन पाणी विभागाची निराळी कार्यशाळा किंवा सामान असावे असे आम्हांला वाटते त्यासाठी आम्ही लेखी पत्रव्यवहारसुद्धा केलेला आहे. आजच्या तारखेला आपल्या गोडाऊनमध्ये एक इंचाचा चार फुटाचा पाईप नाही आहे. स्मशानभूमीमध्ये पाईप लाईन पाणी बंद झाले. पंधरा दिवस पाणी नव्हते. लोकांना हातपाय धुण्याकरीता मला टँकर्स मागावे लागले. आत गेल्या पंधरा दिवसापुर्वी पितळेचा वॉल खरेदी करुन दिला साडेतीनशेचा. त्याच्या दोन महिन्याअगोदर चार हजाराची बिले दिलेली आहेत. म्हणजे एजन्टचे काम आम्ही करायचे का? ही लाखो रुपयांची कामे आणि एक लाख रुपयाचे साधे आपल्याकडे कपलिंग नाही. सरळ सांगून टाकता हे नाही. माझ्या येथे गार्डन आहे वार्डमध्ये तिथे फुटवॉल नाही. अक्षरशः पाणी गार्डमध्ये वाहून जाते आणि तिथे वस्तीमधल्या लोकांना पाणी प्यायला नाही. कारण तिथे फुटवॉल नाही. म्हणून आम्ही लावू शकत नाही. मागे आठ इंचाचा वॉल खराब झाला. मैना बिल्डिंगच्या समोरचा चार भंगारमधले वॉल काढून रिपेरिंग करुन एक वॉल चांगला करुन दिला. खोलायला त्यांच्याकडे पाने नाहीत. त्यांनी बाजूच्या वर्कशॉपमधून उपलब्ध करुन त्या महेश नगरमधल्या सरदारकडे करुन दिले. हे जे प्राथमिक स्वरुपाच्या लागतात. आपण सगळे नगरसेवक आहोत. सगळ्या नगरसेवकांच्या वॉर्डामध्ये मेन्टेनन्सचे काम निघाल्यानंतर हा त्रास सगळ्यांना आहे. केवळ मी बोलतोय म्हणून नाही आहे. आपल्याकडे कुठेही डाय नाही. पाईप ठोकतांना क्रॅक जातात. होल भरण्यासाठी मशिन नाही, टॅपिंग नाही. हे प्लंबर सरळ फॅरल ठोकून देतात आणि मग ते लिकेज होते आणि पाणी रस्त्यावर येते. ह्याच्यावर साहेब कुणाचेही लक्ष नाही. आणखीन दुसरी गोष्ट, मागे मोहन पाटील सभापती असतांना आला होता, नाझरेथ आगर या वस्तीमध्ये सत्संगसाठी आपण आठ इंचाची पाईपलाईन आपण दिली. दिल्लीवरुन एखाद्या कुणाचा फोन आला की, पटापट कामे होतात. पण ह्या ठिकाणी सत्संग नगरपालिकेला किती रुपये देते टॅक्सच्या स्वरुपात. एक रुपया सूद्धा नाही. पण त्याच्यापुढे पाडा आहे आणि आपल्याकडे अनेक योजना आहेत. मग त्याच्यातल्या फार कमी योजना तिथे युटीलाईज होत आहेत. शिवमुर्ती नाईक साहेब मागच्या मे मध्ये तिथे जाऊन बघून आले आणि त्यांनी आम्हांला एक महिन्याचा टाईम दिला की, त्या तिथे लगेच पाईप लाईन टाकून देऊ. आम्हांला सी.आय.जी. नको सिमेंटची नको. फक्त तीन इंचाची जी.आय.जी. पाईप जरी टाकली तरी पुष्कळ झाले. पण पावणे दोन किलोमीटर पाईप लाईन टाकायला आपल्या नगरपालिकेकडे समय नाही आणि तो प्रपोझल मागच्या २००२ मध्ये रितसर मंजुरी आहे. आर्थिक प्रशासकीय मंजुरी त्याला आहे. पण हे जे बजेट तुमचे संपले ६५ कि.मी.चे त्याच्यात कुठेही उल्लेख केला गेला नाही. मंजुरी असून सुद्धा त्यांच्याकडे नकाशे आहेत, प्रपोझल आहे, माझी संक्शनची पत्र आहे. ह्या छोट्या छोट्या लाईनचे कुठेही उल्लेख नाही. बहुतेक ठिकाणी असे प्रकार झाले आहेत. मागच्या वेळेला त्यांनी आश्वासन दिले होते की, पुढच्या सभेत प्रस्ताव आणू.

**दशोरे :-**

हे जे प्रस्ताव आणलेले आहेत, ते ह्यासाठीच आणलेले आहेत. जसे म्हात्रे साहेब म्हणतात की, आपल्याकडे सी.आय.टी. जॉईन्ट नाही आहे, कधी लेट जॉईन्ट नाही आहे, हत्यारे नाही आहेत, साहित्य नाही आहे. आता आपण जे टेंडर आणलेले आहे ते इन्व्हॉल्व मेन्टेनन्सचे आहे. त्याच्यामध्ये जे नऊ नऊ लाखाचे टेंडर आहे ते पुर्ण वर्षाकरिता जो किरकोळ सामान लागणार आहे किंवा जे.सी.बी. लागणार आहे खोदाई करण्यासाठी त्याची सगळी तरतुद आपण ह्याच्यामध्ये केलेली आहे आणि पुर्ण बारा महिन्यांसाठी आपण तरतुद केलेली आहे. त्यामुळे अशी अडचण येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण ह्याच्यामध्ये गफलत करता. त्यात आपण फक्त देखाभाल दुरुस्ती ह्याचे अर्थ दोन होऊ शकतात. पाईपलाईनची देखभाल करणे आणि पाईप लाईन फुटली की, ती रिपेअर करणे. ह्याला दुरुस्ती म्हणतात. दुरुस्तीसाठी लागणारी अवजारे किंवा दुरुस्तीसाठी लागणारा कच्चा माल हा ह्याच्यामध्ये कुठे आहे का? ते आपण आम्हांला सांगावे.

**दशोरे :-**

दुरुस्तीसाठी जे डिटेल एस्टिमेट आहे त्याच्याकरिता काय काय ती फाईल आहे?

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यात उल्लेख केला का? मी सांगतो ना तुमचा जो ठराव दिला तुम्ही देखभाल व दुरुस्ती तर पाईप लाईनची देखभाल केली. एखाद्याचा फोन आला रिपेअर केली. संपलं.

**दशोरे :-**

रिपेअर करण्यासाठी जे काय साहित्य लागणार आहे त्याची लिस्ट आमच्याकडे आहे. डिटेल साहित्य एस्टीमेट केले आहे. ते ह्याच्यामध्ये येणार नाही कारण की हा गोषवारा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, हे बघा. हा शाब्दिक खेळ असतो. ह्याच्यामध्ये तो शब्द नाही आहे. मग आपण जर का उद्या बोलायला लागलो तर त्याला मंजुरी मिळालेली नाही आमचे मटेरियल येणार कसे.

**मा. सभापती :-**

आपण येथे ज्या विषयाला मंजुरी देऊ आणि आता आपण म्हणालात की, ह्यांच्याकडे काम करण्यासाठी अवजारे नाहीत. आजच्या सात दिवसानंतर ह्यांच्या अधिका-यांकडे अवजार नसेल तर त्या अधिका-यांला मी काढून टाकेन. माझे कामाबद्दल असे मत आहे की, दिलेले काम वेळीच झाले पाहिजे आणि मला तक्रार येता काम नये की, दिलेले काम अजून झालेले नाही.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब आपण जी जी रुलिंग दिली आहे त्याचे आम्ही ह्या सभागृहात स्वागत करतो. आपला निर्णय असाच असू दे आणि जी व्यक्ती काम करीत नाही त्यांना तुम्ही घरी पाठवा. हा विषय ह्या ठिकाणी आलेला आहे आणि प्रत्येकामध्ये नऊ नऊ लाख रुपये दिले, मंजुरी दिलेली आहे. त्याच्यामध्ये कुठेही साहित्याचा उल्लेख नाही. आपण स्टॉक रजिस्टर कुठे मेन्टेन करतो त्याचा ही उल्लेख नाही आणि आपले जे प्लंबर आहेत ते काम करत आहेत. ते सांगितले की, आमच्याकडे साहित्य नाही. ह्या कामाला ऑडीटर साहेबांनी मंजुरी दिलेली आहे का त्यांनी तसा खुलासा करावा.

**दशोरे :-**

मा. आयुक्त साहेब आणि ऑडीटर साहेब ह्यांची मंजुरी घेऊन प्रस्ताव सादर केला आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

कुठलाही प्रस्ताव स्थायी समिती किंवा महासभेसमोर येण्यापुर्वी त्या प्रस्तावाची छाणनी करुन गोषवारा तयार केला जातो आणि अर्थसंकल्पात सिमेंटची पाईप लाईन बदलण्याकरिता पुरेश तरतुद केली आहे आणि त्या तरतुदी नुसार हा प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे आणि आपणाला माहिती आहे. शहरात ग्रामपंचायत असताना ब-याच भागामध्ये सिमेंटची पाईप लाईन टाकण्यांत आलेल्या होत्या. सिमेंटच्या पाईप लाईन नेहमी गळती होत असल्याने त्याबद्दल क्रमप्राप्त आहेत. याबाबत मागच्या सभेमध्ये चर्चा झाली आणि स्टेप बाय स्टेप आपण त्याला मंजुरी घेऊन आपण बदलत आहोत. त्याची एस्टीमेंट आहे. त्या एस्टीमेंटमध्ये तरतुदीसाठी लागणारे साहित्य ते एस्टीमेंट त्यांच्याकडे स्वतंत्र आहे आणि आपण त्याला मंजुरी दिल्यानंतर टेंडर निघत असतो. त्या टेंडरमध्ये सर्व डिटेल येणारच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब मागच्या वेळेला मी पत्र दिले होते. पंचवीस गोणी टी.सी.एल. पावडर आली. टी.सी.एल. पावडर आपल्या पाण्याच्या टाकीवर नसेल तर पातळी पाड्यावरुन आणावी लागते. ती टी.एसी.एल. पावडर पावसाचे पाणी त्याच्यावर पडून ते दगड होईल अशा स्वरुपाचे ठेवलेली होती. स्वतः जाऊन ईस्टच्या पाण्याच्या टाकीवरती जाऊन ते तिथून हलवून सुरक्षित जागी ठेवावी लागेल. मी ह्याच्याकरिता सांगतोय जर पावडर नसेल तर पातळीपाड्यावरुन येथे आणण्याकरिता दहा दहा दिवस जातात. तशी ती एक दिवसातही येऊ शकते. पण ती वस्तु हलगर्जीपणामुळे फुकट जाते. ह्या विषयामध्ये कुठेही दिलेले नाही. याकरिता सदर ठिकाणी बिडाची पाईपलाईन टाकणे आवश्यक आहे. तसेच काही ठिकाणी पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती ह्याच्यामध्ये मेन्टेनन्स व एवढी हत्यारे घेण्याकरिता पाच लाख रुपये, दोन लाख रुपये असे काहीही दिलेले नाही. पाचवा विषय जर तो आणला असता तर काय बिघडले असते का? अत्यावश्यक लागणारे सर्व साहित्य आणि अवजारे.

**दशोरे :-**

सन्मा. सदस्यांना मी सांगू इच्छितो की, साहित्याची अप्रुव्हल दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

परवा ओमप्रकाश अग्रवाल येऊन तुमच्याकडे भांडत होते का नाही. तुम्ही भंगारमधून पाईप आणून त्यांच्याकडे टाकले. लोकांचे तोडून आणलेले पाईप तुम्ही लावले.

**दशोरे :-**

साहित्याची अप्रुवल ऑलरेडी दिलेली आहे आणि त्याबाबत आपण सल्पायरला ऑर्डरपण दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कधीपर्यंत येणार?

**दशोरे :-**

बहुतेक पंधरा दिवसांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

आतापर्यंत डिलीव्हरी का झाली नाही? त्याचे कारण काय?

**आसिफ शेख :-**

उपरोक्त कामांना अत्यावश्यक लागणाऱ्या सर्व साधन सामुग्री अवजारांना असे त्याच्यामध्ये उल्लेख करुन घ्या. म्हणजे जेणेकरुन काही त्रास होणार नाही. जो आपल्याला कारभार करायचा आहे तो स्पष्ट आणि पारदर्शक असा कारभार करायचा आहे. त्यामुळे ठराव करतांना स्वयंस्पष्ट ठराव करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

काम कधीपर्यंत होईल?

**मा. सभापती :-**

पंधरा दिवसांत.

**आसिफ शेख :-**

आपण स्टॉक रजिस्टर मेन्टेन करुन घ्या. प्लंबर लोकांना आपण तसे सांगा आणि स्टॉक रजिस्टर मेन्टेन करुन घ्या. ते नेहमी बोलत असतात आमच्याकडे साहित्य नाही.

**दशोरे :-**

स्टॉक रजिस्टर मेन्टेन करायला सांगितले आहे.

**आसिफ शेख :-**

स्टॉक रजिस्टर मेन्टेन करुन आपण ठराव दुरुस्त करुन घ्या.

**धनराज अग्रवाल :-**

अभी जो प्रस्ताव आया है, उसमे जलवाहिनी ९ लाख ९६ हजार और दुसरे तीन है वह देखभाल और दुरुस्ती करना. साहेब मागच्या वर्षाला किती खर्च आला होता आणि आता तुम्ही कुठल्या हिशोबाने ९ लाख ९६ हजार रुपये एस्टीमेट दिले आहे. आयुक्त साहेबांना दहा लाखाची पावर्स आहे म्हणून दहा लाखाचे एस्टीमेट आणले आहे का?

**दशोरे :-**

हे जे आपण तीन केले आहे आणि जर का हे तीस, एकच असते तर एकच एजन्सी आली असती आणि मग मिरा रोड पुर्व आणि पश्चिमेला एकाच वेळी मटेरिअल लागले असते आणि म्हणून कामाला विलंब होईल. त्याकरिता वेगवेगळे तीन केले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

७ लाख, ८ लाख, ९ लाख आणि तुम्ही कुठे दहा लाख ही आणले आहे. त्याचे काय कारण. मी तुम्हांला शिवार गार्डनचा वॉल ठिक करुन लावायला सांगितले होते. पण तो वॉल अजून लागलेला नाही. तीन महिन्यांमध्ये तिथे किती पाणी फुकट गेले असेल. दोनशे, तीनशेच्या रुपयांच्या वॉलमध्ये तीन हजार, पाच हजाराचे पाणी फुकट गेले असेल आणि मला काय उत्तर मिळाले की, तिथे वॉल लावलेले आहे. पण अजूनपर्यंत तिथे वॉल लावण्यांत आलेले नाही. मागे रोड बनवतांना तिथली पाईप लाईन फुटली होती, तेही सांगितले. सहा महिन्यापुर्वी आता दोन दिवसांपुर्वी रिपेअरिंग झाली. म्हणजे आपल्याकडे साहित्य किती. आपण समाजमंदिर येथे पाईल लाईन टाकली ती जुनी पाईप लाईन टाकली. तुमच्याकडे मागच्या वेळी बजेट नव्हता का? तुमच्याकडे मागच्या वेळी बजेट नव्हता आणि तुम्ही सामान आणत नव्हते का? ते आपण मला सांगा आता तुम्हांला दहा लाख लागेल हे कशावरुन?

**दशोरे :-**

समाजमंदिर, शाळा, स्मशानभूमी हे सर्व पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी बांधकाम विभागाची आहे. आपण आम्ही समाज मंदिरसाठी सांगितले होते म्हणून आम्ही आपणाला पाईप लाईन टाकून दिली.

**आसिफ शेख :-**

बांधकाम विभागाने ह्याचा खुलासा करावा.

**शरदचंद्र वैरागडे :-**

कनेक्शन दिल्यानंतर त्या मेन पाईपपासून समाज मंदिरपर्यंतची घेण्याची जी पाईप लाईनची अर्धा इंचाची जबाबदारी आहे ती बांधकाम विभागाची आहे.

**धनराज अग्रवाल :-**

बांधकामाची भिंत बांधतांना पाणी खाते त्याचा प्रस्ताव आणतोय. त्यावेळेला पाणी खात्याची जबाबदारी आहे असे इंजिनिअर साहेबांनी सांगितले होते की, पाणी खात्याची जबाबदारी आहे. पाणी खाते दिवार बांधू शकतो आणि आता एक पाईप लाईन आणायला बांधकामाची जबाबदारी आहे. बांधकामाचे काम हे लोक आणू शकतात आणि एक दिवार बांधायचे लाखो रुपयाचे काम आणतात आणि पाचशे रुपयाची पाईप लाईन हे आणू शकत नाही.

**आसिफ शेख :-**

हे काम करण्याची जबाबदारी कुणाची आहे ते निश्चित केले पाहिजे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

मेन पाईप लाईनची जबाबदारी फक्त त्यांची आहे आणि अर्ध्या इंच आणि एक इंचाची जबाबदारी बांधकाम विभागाची आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण आपली जबाबदारी बरोबर वाटून घ्यावे. पाहिजे तेव्हा सांगतात आमची जबाबदारी आहे आणि कधी सांगता त्यांची जबाबदारी आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

मेन जी पाईप लाईन आहे सी.आय.ची किंवा चार इंच, सहा इंच, आठ इंच ही जबाबदारी जी आहे आणि कनेक्शन घेण्याची जबाबदारी जशी इन्डीव्हयूजअल सोसायटीची असते. तशी ती बांधकाम घेतो.

**धनराज अग्रवाल :-**

मागच्या वर्षाला एका विभागामध्ये किती खर्च झाला ते आपण सांगा कारण आता तुम्हाला दहा लाख पाहिजे आणि एक दुसरी गोष्ट सांगता. मागच्या वेळेला जुनी पाईप लाईन होती आणि तुम्ही लगबग जुनी पाईप लाईन बदलून टाकलेली आहे. मग मागच्या वेळेला जर दहा लाख रूपये लागले असेल तर ह्या वेळेला तुम्हाला चार लाख रूपये लागणार नाही कारण आता रिपेरिंग जास्त काय होणार नाही. वॉल वगैरे छोटे मोठे पाईप लागणार तेवढेच रिपेरिंग होणार मग दहा दहा लाख रूपये पाहिजे कशाला? पाईप लाईन बदलायला आम्ही मंजूरी देतो. पाईप लाईन जी खराब असेल त्याला

बदलून टाका. पाणी सगळ्यांना गेले पाहिजे. पण पैसे तुम्हाला पाहिजे ते तुम्ही कशाला मंजूर करून घेता.

**दशोरे :-**

हे जे आहे ते किरकोळ सामान आहे. आता जसे बोलले गेले की सा.आय.जी. पाईन नाही, वॉल नाही त्याच्याकरिता हा विषय आणला आहे.

**धनराज अग्रवाल :-**

गेल्या वर्षी किती सामान लागले ते आपण सांगा.

**दशोरे :-**

आता माझ्याकडे गेल्या वर्षीचा रेकॉर्ड नाही आहे. पण पन्नास लाखाच्यावर सामान लागले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

तुमच्याकडे एक साधा वॉल मिळत नाही. पाच फुटाचा पाईप मिळत नाही. तर ते पन्नास लाख रूपये गेले कुठे? तुम्ही चुकीची माहिती देताहेत. तुमच्याकडे साधा एक वॉल केव्हाही मिळत नाही. मी एकटा नाही तुम्ही कुठल्याही ८४ नगरसेवकांना विचारले तर आज हे नाही ते नाही असे उत्तर मिळते. आणि ते रिपेरिंग होतच नाही. तुम्ही नंतर कुठून तरी जुने साहित्य शोधून आणता आणि लावतात. पन्नास लाख रूपये कुठे गेले आणि असेच खर्च होणार असतील तर आम्ही ह्याला मंजूरी देत नाही.

**दशोरे :-**

आम्हाला जसे साहित्य लागणार आहे त्याप्रमाणे आम्ही हा प्रस्ताव आणला आहे. आणि आपणाकडून मंजूरी मिळाल्यानंतर आम्ही लगेच दुरूस्त करू. कारण मटेरियलची शॉटेज आहे आणि आम्ही ह्याच्यामध्ये सर्व प्रोव्हीजन केली आहे. एकूण ३४ आयटम आहे आणि त्या ३४ आयटममध्ये पूर्ण प्रोव्हीजन केली आहे का, काय काय मटेरियल लागणार आहे. आता समजा आपण रस्ता खोदला आणि आठ फूट लाईन खाली आहे. जे.सी.बी. शिवाय काम होत नाही. माणसे लावली तर पाच ते सहा दिवस लागणार. तसे जे.सी.बी. ची प्रोव्हीजनदेखील आम्ही ह्याच्यामध्ये केलेली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

महापालिकेकडे जे.सी.बी. आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जे.सी.बी. चा विषय वेगळा आणायला पाहिजे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा।.) :-**

सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल व मिलन म्हात्रे साहेब आपण जे आता बोललात त्याबद्दल मी ह्यांच्याशी चर्चा केली असता त्याच्यामध्ये माझा सुद्धा गैरसमज झाला होता. ह्यांनी जे टेंडर कॉल केलेले आहे ते टेंडर ॲन्युअल मटेरीयलसाठी टेंडर कॉल केले आहे. ह्यांनी त्या भागाकरिता लागणारे साहित्य त्याच्यासाठी ही निविदा काढलेली आहे. त्यानिविदामध्ये त्यांनी त्याभागाला लागणारे प्रत्येक साहित्य ह्याची आपण सन्मा. सदस्यांना कॉपी वितरीत करावी व किती सामान लागणार हे त्यांना द्यावे.

**आसिफ शेख :-**

हे वाषिक टेंडर मागविता ते आम्हाला मान्य आहे. पण असे लिहा ना आपण की जे.सी.बी. लागणार आहे. सभापती साहेब आपण अशी रूलिंग द्या की सभागृहात स्वयंस्पष्ट टिपणी आणि गोषवारा आला पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

मागच्या वर्षी किती खर्च झाला त्याची माहिती देखील आणायला सांगावे.

**मा. सभापती :-**

संबंधित खात्याबरोबर सदरच्या विषयावर चर्चा करून हा विषय पुढच्या सभेत घेण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

सर्वात महत्त्वाचे सांगतोय हे जे कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग सन्मा. दशोरे साहेब त्यांची नियुक्ती मिरा भाईंदर महानगरपालिकेत कोणत्या पदावर झालेली आहे. त्यांना कार्यकारी अभियंता हा चार्ज एम.जे.पी.ने दिलेला आहे का? कारण त्यांचे मालक हे एम.जे.पी. आहेत आणि दुसरे अतिरिक्त कार्यभार कोणी देऊ शकत नाही. कार्यकारी अभियंता हा प्रभारी कार्यकारी अभियंता आहे का त्याच्यापेक्षा आणखीन काय आहे त्याचा खुलासा येथे झाला पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे नऊ लाख शहाण्णव हजार, साहेब आमचे ह्याकामाला कुठल्याही विरोध नाही. सरसकट दहा लाखाच्या आतले हे आयुक्त साहेबांकडून मंजूरी घेऊन येतात ह्याला तांत्रिक मंजूरी आहे का? टेक्निकली हा

जो ठराव आणला आहे त्याची टोटल रक्कम ४० लाख होणार आहे. एवढी मोठी रक्कम आणि खाली जी सही केली आहे त्याचा मला खुलासा पाहिजे. कार्यकारी अभियंता एम.जे.पी.कडून त्यांना चार्ज देण्यात आलेला आहे का? खाली दिलेला आहे जिम्मेदार म्हणून मी सही करतो की हा चाळीस लाखाचा खर्च येणार आहे. त्याची पात्रता ह्याबद्दल रितसर खुलासा होउ दे. त्यानंतर आपण ह्याठरावावर चर्चा करा. तसेच त्यांच्याकडे जे ओरिजनली पदभार आहे त्या पदभाराचे त्यानी स्वाक्षरी करावी किंवा आयुक्त साहेबांकडून परमीशन घ्यावे.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त साो.) :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब आपण सांगितल्याप्रमाणे श्री. दशोरे उपअभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वर्ग - १ श्रेणीचे उपअभियंता आहे. आणि वर्ग-१ श्रेणीचे उपअभियंता असल्यामुळे त्यांना शासनाच्या ह्याच्यामध्ये वरीष्ठ दर्जा मिळतो वर्ग-१ श्रेणीमुळे. त्यामुळे त्यांना मा. आयुक्त साहेब ह्यांना प्रभारी कार्यकारी अभियंताचा पदभार दिलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आता प्रभारी बोललात आणि येथे कार्यकारी अभियंता असे आलेले आहे आणि माझे म्हणणे असे आहे एम.जे.पी.ने त्यांना पदोन्नती किंवा पगारामध्ये वाढ ते एम.जे.पी. ने देणे गरजेचे आहे. आयुक्त साहेबांनी त्यांना बढती द्यायची असली तरी त्या बढतीला आमचा विरोध नाही. जो त्यांचा मुळ मालक आहे त्या मालकाबरोबर त्यांनी पत्रव्यवहार करावा त्यांच्याकडून पोस्ट मंजूर करून येथे आणावी आणि त्यांना तो पदभार द्यावा, पगार द्यावा. त्याच्यात आमचे काहीही दुमत नाही. परंतू जे कोणाच्याही अधिका-यात नसेल ते आपण करू नका. प्रभारी म्हणून आपण आता स्वतः बोललात आणि येथे कार्यकारी अभियंता असे दिले आहे. ह्या अमाऊंटला, ह्या ठरावाला माझा स्वतः विरोध असेल. मतदान करायचे असेल तर मतदान येथे होऊन जाऊ दे.

**रिटा शाह :-**

साहेब, हा जो विषय येथे आला आहे तर डेप्युटेशनवर आपल्याकडे कितीतरी अधिकारी आलेले आहेत. सर्व अधिका-यांची चौकशी करायचे की ते नेमके कुठल्या पदावर ह्या महानगरपालिकेत आलेले आहे. आणि ते कुठला पदभार सांभाळत आहेत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

आता जे तांत्रिक मंजूरीचा प्रश्न मांडला. त्यात तांत्रिक मंजूरीही प्रशासकीय व आथिर्क मंजूरी मिळाल्यानंतर तांत्रिक मंजूरी ही शहर अभियंता हयांची घेतल्यानंतरच कामाला सुरूवात होईल. यापूर्वी सुद्धा रूलिंग झाले होते शहर अभियंता ह्यांनाच सर्व विभागाच्या बांधकामाची आणि इतर कामाच्या तांत्रिक मंजूरीचे अधिकार प्राप्त आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आम्हाला सांगा की तांत्रिक मंजूरी घेण्याच्या अगोदर हा विषय आमच्याकडे पाठविला आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

प्रशासकीय आणि आर्थिक मंजूरी अगोदर द्यायची असते. त्यानंतर तांत्रिक मंजूरी घ्यायची असते.

**मिलन म्हात्रे :-**

असे नाही आहे. उद्या जर ह्या मेजरमेन्टमध्ये गडबड आहे. ह्या रक्कमेमध्ये गडबड आहे. एक वॉल एक लाख रूपयाचा, दोन लाखाला तो आणला नंतर आमची मंजूरी घेतल्यानंतर तुम्ही त्यांच्याकडे जाणार. हे जर काम तुमचे नऊ लाखाचे आहे आणि ॲक्च्युअल सहा लाखाचे असेल आणि तीन लाख रूपये जर जास्त असतील तर आमचा ठराव पास झाल्यानंतर त्यांच्याकडे जाणार का? सुधारून आणायचे का, काय करायचे. साहेब सर्व मंजूरी मिळाल्यानंतर हा ठराव आमच्याकडे आला पाहिजे. साहेब तुम्हाला जी योग्य रूलिंग वाटेल ती आपण आम्हाला द्या. एखादी वस्तू ती वस्तू जर आपल्याला एक लाख रूपयात भविष्यात विकत घ्यायची आहे. त्याचा ठराव तुम्ही सभागृहापुढे आणलात पण जो तांत्रिक सल्लागार आहे तोच सांगू शकेल ना ही एक लाखाची नाही ऐंशी हजाराची वस्तू असेल. तुम्ही सर्व तपासून आमच्याकडे आणा. आधी तुम्ही त्यांचा सल्ला घ्या आणि सांगा. आम्ही विषयाला मंजूरी दयायची आणि जो फरक असेल तर आतमध्ये आम्ही जायचे आणि ह्यांनी येथून निघून जायचे बदल्या करुन.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

पी.डब्लू.डी मॅन्युअलप्रमाणे काय आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

पी.डब्लू.डी. मॅन्युअलमध्ये आधी प्रशासकीय मान्यता घेतो व नंतर टेकनिकल मान्यता घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी समितीमध्ये ठराव मंजूर होण्याच्या अगोदरच्या प्रोसिजर आपण आम्हाला सांगा.

**दिपक खांबीत :-**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ नुसार आपण आपले असे लेखे ठेवतो त्याच्यामध्ये कलम १६० मध्ये प्रशासकीय आर्थिक मंजूरी आहे. त्याच्यानंतर १६१ ही तांत्रिक मंजूरी आहे. आपण हे ॲडाप्ट केले आहे. त्यामुळे आपण त्याप्रमाणे चालतो. पण इतर महानगरपालिकेत काय पद्धत आहे ते आपण बघून त्याप्रमाणे कार्यवाही करू.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही बघाल तोपर्यंत हा विषय पेन्डींग ठेवा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य साहेब प्रशासकीय मंजूरी आणि आर्थिक मंजूरी कोणत्याही कामाला अंदाजित खर्चाला दिला जातो. परंतू तांत्रिक मंजूरी करताना जे तांत्रिक सक्षम अधिकारी राहतात ते ह्याची स्कुटनी करतात. त्यामध्ये दरात जर तफावत वाटत असेल तर त्या त-हेची दुरूस्ती त्यामध्ये केली जाते. आणि तांत्रिक मंजूरी दिली जाते. अंदाजित खर्च आणि तांत्रिक मंजूरी हे दोन्ही वेगवेगळे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी सांगितले जे.सी.बी. आम्ही आणणार. जे.सी.बी. बांधकाम खात्यामध्ये सर्व खात्यामध्ये वर्षाचे जे.सी.बी.चे निराळे टेंडर निघते. ते त्यांचे टेंडर त्यांच्या विभागाला दिले गेले आहे, बाकी आहे का? त्याचे किती तास बाकी आहे. त्याचा तुम्ही उल्लेख करा आणि कार्यकारी अभियंता का प्रभारी कार्यकारी अभियंता त्याचा आपण खुलासा करावा.

**दशोरे :-**

मी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे उपअभियंता म्हणून येथे नेमणूक झालेली आहे. येथे कायर्कारी अभियंता सॅक्शन पद आहे. पण इथे कार्यकारी अभियंता नसल्यामुळे मला अतिरिक्त कार्यभार दिला आहे. जर मला उपअभियंताचे कार्यभार देउन हे पद माझ्याकडून काढून घेतले तर त्यात माझी काही हरकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे आपण सर्व अधिकारी आणले. टाउन प्लानिंगसाठी अधिकारी आणले. मग ही पोस्ट का भरली जात नाही. मुद्दामुन एवढ्या वर्षापासून का रिक्त ठेवली आहे. आम्हाला येऊन चौदा महिने झाले. ऑडीटरची पोस्ट आपण नेमली. टाउन प्लानिंगची पोस्ट नेमली. दोन उपआयुक्त वाढले आणि जो महत्त्वाचा विभाग आहे पाणी विभाग तिथली पोस्ट का भरली जात नाही.

**रिटा शाह :-**

प्रतिनियुक्तीवर जे अधिकारी आले आहेत. त्यात तुम्ही किती अधिका-यांना प्रभारी असा चार्ज दिला आहे. त्याची माहिती ही आपण आणावी.

**मिलन म्हात्रे :-**

रोस्टरमध्ये पद असताना आपण तो अधिकारी मागवायचा नाही. आणि दुसरा अधिकारी तिथे ॲग्जेस करायचे हे का चालले आहे. तो अधिकारी मागवायला कुठली अडचण आहे का? सभागृहाने मंजूरी दिली नाही का? शासनाकडे अडचण आहे का? पण त्या अधिका-याचे पद भरायला कोणी प्रयत्न करत नाही. हे जे चुकीचे दिले आहे कार्यकारी अभियंता तिथे प्रभारी कार्यकारी अभियंता पाहिजे.

**रिटा शाह :-**

साहेब, आमच्या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही आणि दुसरेच अधिकारी उठून प्रश्न करतात हे काय चालले आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

श्री. दशोरे ह्यांच्याकडे अतिरिक्त पदाचा पदभार आहे. ते वर्ग - १ उपअभियंता या श्रेणीच्या संवर्गातील आहेत. कार्यकारी अभियंता या संवर्गातील नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पाणी पुरवठा विभागासारखे अत्यंत महत्वाच्या विभागामध्ये एखादा मोठा सक्षम अधिकारी आणला तर त्याला टेक्निकली माहिती ह्यांच्यापेक्षा जास्त असेल. आणि असा सक्षम अधिकारी आणायला आपल्याला काय प्रॉब्लेम आहे. त्याचे उत्तर मला पाहिजे आणि आपण असा अधिकारी आणणार आहात का नाही आणणार आहात आणि येणार तर किती महिन्यात येणार? त्याबाबत आपण आम्हाला आपले रूलिंग द्यावे.

**रिटा शाह :-**

ठिक आहे. दशोरे साहेबांना आपण आपल्याकडे अधिकारी नाही म्हणून कायर्कारी अभियत्यांचे कार्यभार मा. आयुक्त साहेबांनी दिलेला आहे. आपल्याकडे प्रतिनियुक्तीवर किती अधिकारी आलेले आहेत आणि प्रभारी म्हणून किती अधिकारी काम करत आहे. त्याची माहिती सभागृहाला मिळू शकेल का ?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

माझ्या माहितीप्रमाणे प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिका-यांपैकी श्री. दशोरे हे प्रभारी कायर्कारी अभियंताचे पदभार सांभाळत आहे. अन्य कोणीही नाही.

**रिटा शाह :-**

आपल्या महानगरपालिकेत आलेल्या सर्व खात्यांच्या अधिका-यांबद्दल मी बोलत आहे. आपले जे अधिकारी आहेत त्यांच्यापैकी किती जणांना प्रभारी चार्ज दिला आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

हरेश पाटील आहेत त्यांना आपण प्रभारी म्हणून चार्ज दिला आहे आणि त्याच्यानंतर अनेक कर्मचारी आहेत.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण आता सभेत बोलतो तर त्याची माहिती आपल्याला आता मिळणार नाही का?

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब ह्यांनी जे लिहिलेले आहे ते चुकीचे आहे. येथे प्रभारी कार्यकारी अभियंता असे पाहिजे.

**आसिफ शेख :-**

साहेब, मला वाटते आपण जे आता हरेश पाटील साो. ह्यांच्या नावाचा जो उल्लेख केला तर मला वाटते आपल्याला त्यांना आधी धन्यवाद द्यायला पाहिजे. त्यांनी आम्हाला जे सभेचे पत्र पाठविले आहे त्यात दरवेळी ते प्रभारी महापालिका सचिव असे पाठवितात आणि आता त्यांनी नगरसचिव म्हणून सही केली आहे. त्याकरिता आपण सर्वांनी त्यांना धन्यवाद दिले पाहिजे आणि त्यांचे अभिनंदन केले पाहिजे की त्यांची नियुक्ती त्याठिकाणी झालेली आहे. आणि अशाप्रकारे कितीजणांना आपण प्रमोशन दिले आहे. त्याची माहिती आपण सभागृहाला द्यावी.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेखजी आता येथे प्रमोशनचा विषय नाही आहे व प्रमोशन बाबतची माहिती मिळाल्यावर ती माहिती सभागृहाला देण्यात येइल. आणि आता पाण्याचा विषय चालू आहे त्यावर चर्चा होऊ दे.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब येथे प्रभारी कार्यकारी अभियंता असे पाहिजे.

**मा. सभापती :-**

याबाबत उपआयुक्त साहेब आपल्याला उत्तर देतील.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

अतिरिक्त पदभार दिला जातो त्यावेळी नियमाची आवश्यकता नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हांला मंत्रालयात पत्रव्यवहार करायचा आहे ही पोस्ट भरा म्हणून.

**आसिफ पटेल :-**

शिल्लक असतील तर सर्वांनाच चार्जेस देऊन टाका. प्रमोशन एकदा सर्वांना देऊन टाका. फार वर्षापासुन प्रलंबीत आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आज हा एवढा ४० लाखाचा ठराव मंजूरीला आला आहे. त्याच्यामध्ये महत्वाची चूक आहे. याबाबत एम.जे.पी. चे काय म्हणणे आहे. त्यांनी काय दिले आहे का?

**दिनेश नलावडे :-**

आपण आजच दशोरे ह्यांच्या स्वाक्षरीने विषय मंजूर करतोय का? ह्याअगोदर देखील पाणी विभागाचे जेवढे विषय दशोरे ह्यांच्या स्वाक्षरीने आले ते आपण मंजूर केले आहे. केळकर साहेब किती पोस्ट खाली आहेत.

**याकुब कुरेशी :-**

येथे विषयांतर होत आहे. भलताच विषय येत आहे. ज्याविषयावर आपल्याला चर्चा करायची आहे. त्या विषयावर चर्चा करावी.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही विषयाला धरूनच बोलतोय. ही जी चाळीस लाखाची ॲथोरिटी आहे. स्वाक्षरीला धरूनच आम्ही बोलतोय. येथे प्रभारी लिहायला पाहिजे ते का लिहिले नाही. तुम्ही जर दहा दहा लाखांच्या मंजूऱ्या आयुक्त साहेबांकडून घेता तर येथे कशाला नऊ नऊ लाखाचे विषय आणता.

**चंद्रकांत वैती :-**

मिलन म्हात्रे साहेब, मा. उपआयुक्त साहेब, ह्या विषयावर जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये स्थायी समिती सदस्यांची आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नगरसेवकांची भावना ह्या आहेत की ५० एम.एल.डी. ची योजना लागू झाल्यानंतर त्याच्याआधी आपल्याकडे ३१ एम.एल.डी. पाणी होते. एकूण आपल्याकडे ८१ एम.एल.डी. पाणी झाले आणि त्याचे डयूरेशन पूर्ण झालेले आहे आणि आज आपल्याला पूर्ण पाणी मिळाले पाहिजे. सभा सुरू होताना याविषयावर बोललो होतो आपण स्थायी समितीची सभा संपल्यानंतर ह्याविषयावर चर्चा झाली पाहिजे होती. माजी सभापती मोहन पाटील साहेब ह्यांना आपण वेळोवेळी विनंती केली होती की, ह्याविषयावर आपण एक स्पेशल सभा लावा. परंतू ती सभा काही लागली नाही. आतापर्यंत आपण पाण्याचा विषय पाहिल्यानंतर दशोरे साहेबांकडे अतिरिक्त पदभार आहे. त्यांची मुदत किती आहे. चौदा महिने त्यांनी कामकाज केलेले आहे. त्यांच्या कामाबद्दल वेळोवेळी अनेक सदस्यांनी आपआपल्या भावना प्रखररितीने तीव्र पद्धतीने व्यक्त केलेल्या आहेत. त्याच्यावरती अंमलबजावणी काही होत नाही. सन्मा. सभापती साहेबांनी सांगितले की ह्याबाबत योग्य ती माहिती पुढच्या वेळेला घेउन योग्य तो निणर्य घेण्यात येइल. आणि अकार्यक्षम अधिकाऱ्यांवर कायर्वाही करण्याची त्यांना सूचना देखील केलेली आहे. आज ही निविदा काढली त्याच्यामध्ये सर्व सदस्यांची एकच भावना आहे की आम्हाला ह्याविषयावर सविस्तर अशी माहिती पाहिजे. आतापर्यंत पाणी याविषयावर जेवढया निविदा निघाल्या, त्या निविदा आयुक्त साहेबांनी दहा लाखाच्या आतची निविदा सांगून आपल्या स्थायी समिती समोर फक्त आर्थिक प्रशासकीय मंजूरीसाठी आणली. त्याच्यावर कार्यवाही काय झाली याबाबत सविस्तर माहिती मी दशोरे साहेबांकडून मागविले होते. त्यावेळेला त्यांनी संपूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये जी पाईप लाईन टाकलेली आहे सी.आय.ची, बिडाची आहे. जी लाईन आहे त्याची डिटेल त्यांनी आपल्याकडे दिले. परंतू आज हा विषय आला आहे तर त्याच्यामध्ये घोडबंदर परिसरातील ह्या ग्रामीण भागाची कमतरता आहे. त्या क्षेत्रात लाईन टाकायचे आहे आणि लाईन टाकायचे काम चालू आहे. तुमच्या हेडखाली चालू आहे तिथे नविन पाईप लाईन टाकायचे आहे. परंतू त्या टोकापर्यंत जाण्यापेक्षा त्याची सविस्तर टिपणी घेउन हा विषय पुन्हा एकदा सभागृहासमोर आणावा आणि आपल्याकडे असलेला अतिरिक्त कार्यभार आहे तर आपण काय प्रकारची नोंद केली पाहिजे. ॲक्टमध्ये प्रोव्हीजन काय आहे? केळकर साहेब आपण ते चेक करून घ्यावे, आता सभापतीं समोर स्थायी समितीच्या सर्व सदस्यांसमोर. कारण स्थायी समितीच्या सभापतींनी अधिकाऱ्यांबरोबर योग्य ती चर्चा करावी व ठाम असा निर्णय घ्यावा. आणि वारंवार जेव्हा पाण्याचा विषय येतो वेगवेगळे प्रश्न येतात. आजपर्यंत ह्या महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर सर्वात जर कुठला विषय गाजला असेल तर तो ''पाणी'' हा विषय गाजला असेल. कारण आपण बघितले आहे की आयुक्त साहेबांना सरळ सरळ संरक्षण देऊन हा विषय पुढे नेलेला आहे. तरी आपण याबाबत डिटेलमध्ये जाउन उपायुक्त साहेब आपण कार्यालयीन मुख्य आहात. आपण याबाबत योग्य ती माहिती घ्यावी आणि एक चांगला सक्षम असा निर्णय घ्यावा आणि सर्व सदस्यांच्या मनामध्ये असलेल्या बऱ्यावाईट भावना त्याचे आपण निरसन करावे.

**रिटा शाह :-**

साहेब सदरच्या विषयावर आपली रूलिंग काय आहे.

**याकुब कुरेशी :-**

काशीमिरा रोडला नविन पाईप लाईन एम.जे.पी. टाकते. त्याच्यामध्ये नताशा बिल्डिंग आणि शंभर मिटर असा भाग असेल तो जोडणी झालेला नाही. आणि माझ्या माहितीप्रमाणे तिथे कोणीतरी अडथळा आणतोय व ती पाईप लाईन टाकू देत नाही. अशातला भाग असून त्याचावर लवकरात लवकर कार्यवाही करावी. अशी मी विनंती करतो.

**मा. सभापती :-**

दशोरे साहेबांनी जी स्वाक्षरी बजेटला केली आहे. त्याचे जिम्मेदार ते असतील आणि त्यांच्यावर सर्व जबाबदारी असेल अशी मी रूलिंग देतो.

**रिटा शाह :-**

हा ठराव मंजूर झाला का नाही.

**याकुब कुरेशी :-**

पाटील साहेब पुढचा विषय घेण्यापूर्वी मी जो प्रश्न मांडला होता काशी मिरा रोडच्या येथील जुना पेट्रोल पंपच्या समोर जो अडथळा आहे तो अडथळा कोणी आणला होता.

**संजय कांबळे :-**

सदर ठिकाणाबाबत माहिती घेऊन आपल्याला सांगतो.

**याकुब कुरेशी :-**

माझ्या माहितीप्रामणे एम.जे.पी.च्या लोकांना तिथल्या लोकांनी मारहाण केली त्याची पोलिस कप्लेंट का झाली नाही. एवढ्या मोठमोठ्या घटना घडतात आणि आम्हाला कळतही नाही आणि अधिकारी उत्तर देतात आम्ही माहिती घेऊन आपणाला उत्तर देतो.

**दशोरे :-**

ते एम.जे.पी.चे काम असेल. आपले काम नाही. आपण त्याच्यावर सुपरविझन करतो.

**याकुब कुरेशी :-**

एम.जे.पी. चे काम असले ती जबाबदारी ही आपली आहे आणि त्याची आवश्यकता आपल्याला आहे.

**दशोरे :-**

आमच्याकडे तसे मॅटर आले नाही आणि ते अधिकारी किंवा अप्रोच आमचेकडे आले नाही.

**याकुब कुरेशी :-**

काम बंद का पडले त्याबाबत आपण का विचारत नाही.

**दशोरे :-**

जे काम बंद पडले आहेत त्याबाबत आम्ही चौकशी करतो.

**याकुब कुरेशी :-**

आम्ही सांगितल्यानंतर एम.जे.पी.चे जरी काम असले तरी ते आपल्यासाठी आहे की नाही. तीन महिने झाले काम बंद आहे. तीन महिन्यापर्यंत आपली सुपरवायझींग काय करते.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब याबाबत मी यापूर्वीही सांगितले आहे. जेव्हा आपण एखादे टेंडर काढताना किंवा प्रशासकीय मंजूरी देताना टेकनिकल निर्णय घेताना त्या जागेचा प्राब्लेम आहे का? ती जागा आपल्या मालकीची आहे का? भविष्यात वाद निर्माण होणार आहे का? या गोष्टी तपासूनच सभागृहापुढे यायला पाहिजे. पण तसे काही होत नाही. मग ह्याला जबाबदार कोण? सभापती साहेब आपण आदेश द्या की येथून पुढे जे प्रस्ताव सभागृहापुढे येणार त्या प्रस्तावाला भविष्यात अडचणी निर्माण होणार त्या अडचणी दूर करून तसे प्रस्ताव सभागृहापुढे यायला पाहिजे असे आपण संबंधित खात्यांना आदेश द्या.

**मा. केळकर सा. (उपआयुक्त):-**

सन्मा. सदस्य याकुब कुरेशी हयांनी सांगितले की, एम.जी.पी.च्या कर्मचा-याना मारहाण केली. आता चौकशी केली तर मला कळले की त्यांनी प्रशासनाला तसे काहीच कळविले नाही आणि हे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाईप लाईन टाकत असताना झालेले आहे आणि त्यामध्ये जर अशी

कोणत्या तऱ्हेची अडचण आली असेल तर लगेच आम्ही आज त्यांच्याशी संपर्क साधतो आणि ते काम तात्काळ होण्याच्या दृष्टिने कार्यवाही करतो आणि लगेच ते काम होईल असे आपणाला सांगू इच्छितो.

**याकुब कुरेशी**

साहेब, हयाचे कारण एवढेच आहे की, जी आपली जिल्हा परिषदेच्या वेळी पाईप लाईन काशिमिराला टाकलेली आहे. त्याच्यामध्ये कमीत कमी माझ्या अंदाजप्रमाणे दीडशे लिकेज आहे आणि दीडशे लिकेजमधले पाणी सगळे गटाराचे व घाण् पाणी येते. आपण एवढे सर्व करुनसुद्धा ही परिस्थिती असल्यामुळे ही नविन पाईप लाईन टाकण्याचा उद्देश होता आणि अशा कामाला प्रोत्साहन न देता किंवा त्याच्यावरती दुर्लक्ष करतात. हे चुकीचे आहे. बेजबाबदारपणे वागतात असे मी सांगेन. कारण की जी लाईन दीडशे ठिकाणी माझ्या अंदाजप्रमाणे तुमच्या अंदाजप्रमाणे ती लाईन खोदून बघितली तर आणखीन जास्त निघेल अशा परिस्थितीमध्ये हे काम तीन-तीन महिने थांबते आणि आपण त्याच्यावर लक्ष देत नाही. किती शरमेची गोष्ट आहे.

**मा. सभापतीः-**

हयाच्यापुढे सर्व गोष्टीमध्ये व्यवस्थित लक्ष दिले जाईल आणि हया सभेनंतर पुढच्या सभेत जर असे विषय आले तर सन्मा. सदस्यांनी माझ्या निर्दशनास ती गोष्ट आणून दयावी. ते काम झाले का नाही झाले ते मला कळवावे. मी संबंधित अधिका-यांना सांगून ते काम करुन घेईल.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय सविस्तर माहितीसह पुढच्या सभेत घेण्यात येइल.

**प्रकरण क्र. १३६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ठिकठिकाणी नविन जलवाहिनी टाकणे व पाणी पुरवठा वितरण व्यवस्था देखभाल दुरूस्तीच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे.

(मा. सभापती साो. यांच्या आदेशानुसार सदर विषय पुढील सभेत ठेवण्यांत आला.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३७ चे वाचन केले.)

**आसिफ शेखः-**

प्रकरण क्र. १३७ या संदर्भात याचिका आहे आणि ती हायकोर्टात दाखल आहे. त्याचे काय झाले? दशोरे साहेब आपण याबाबत कोर्टात एक-दोन दिवस होता. आपण त्याची माहिती सभागृहाला दयावी.

**रिटा शाहः-**

न्यायप्रविष्ट असताना आपल्याला ठराव करण्याचा अधिकार आहे का?

**आसिफ शेखः-**

आपण ठराव करत नाही. माहिती मागतोय की कुठपर्यंत न्यायालयात प्रकरण आले आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख आपण विचारल्याप्रमाणे वस्तुस्थितीमध्ये न्यायालयाच्या न्यायालयामध्ये प्रविष्ट आहे. उच्च न्यायालयामध्ये आपले अधिकारी होते आणि उच्च न्यायालयाचे जजमेन्ट हे एक-दोन दिवसात अपेक्षित आहे आणि जे एक लाख रुपये एम.जे.पी.ला द्यायचे आहे. त्याच्यापूर्वी सचिव पाणीपुरवठा विभाग ह्यांच्याकडे चर्चा झाली होती. तेव्हा मोठे आंदोलन शांतीनगरच्या नागरिकांना केले आणि त्यावेळेस आपण असे ठरविले होते की काही खर्च नगरपालिकेने करावा आणि काही खर्च शांतीनगरने ७० टक्के आणि ३० टक्के करावा. त्याप्रमाणे ३० टक्के खर्च नगरपालिकेवर आलेला आहे. त्यातले एक लाख रुपये एम.जी.पी.ला मूळ नियंत्रण दक्षताबाबत जे एस्टीमेन्ट वगैरे त्यांनी तयार केले आहे. त्याचे आपल्याला एक लाख रुपये दयायचे आहेत.

**धनराज अग्रवालः-**

सभापती महोदय त्याचा काय करारनामा झाला आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.):-**

होय करारनामा झालेला आहे.

**चंद्रकांत वैतीः-**

शांती स्टार या वसाहतीमध्ये पाण्यासाठी जेव्हा जेव्हा आंदोलन झाले आणि ब-याच वेळेला हा प्रश्न महाराष्ट्र शासनाकडे चर्चेला गेला आणि त्या चर्चेला तात्कालिन पाणीपुरवठा मंत्री मा. आर. आर. पाटील साहेब यांच्या दालनात मा. महापौर, तत्कालीन मा. सभापती, मा. उपमहापौर व इतर नगरसेवक हे देखील गेले होते आणि बऱ्याच चर्चेनंतर शांती स्टार बिल्डरने तिथे पाण्याची टाकी

बांधावी व शंभर टक्के खर्च त्यांनी करावा. परंतु शासनाकडे गेल्यावर ३० टक्के जबाबदारी नगरपालिकेवर आली. ७० टक्के जबाबदारी त्यांच्याकडे गेली आणि आज जे टाकीचे काम चालू आहे ते काम व्यवस्थित होते का? ह्याच्यावर एम.जे.पी. पाहणी करणार त्याच्यासाठी आपण एक लाख रुपये ह्या देखभालीचे त्यांना मानधन म्हणून देणार आहोत आणि जो हायकोर्टात प्रस्ताव होता त्याच्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सचिवांसमोर कमिशनर आणि शांती स्टारचे डायरेक्टर ह्यांच्यामध्ये ॲग्रीमेन्ट झालेले आहे आणि त्यांच्यामध्ये टाकीचे काम पूर्ण होइपर्यंत पाईप लाईनचे काम पूर्ण होईपर्यंत महापालिकेच्याद्वारे फक्त दिड एम.एल.डी. पाणीपुरवठा केला जातो. बाकी पाणी पुरवठा एम.आय.डी.सी. कडूनच केला जातो आणि हे होत असताना आपण परस्पर शांतीनगर वसाहत आपल्याकडे हॅन्डओवर करुन घ्यावी म्हणून सन १९९९ मध्ये हा ठराव केला होता. तो ठराव मी मांडला होता व त्याला अनुमोदन सध्याचे मा. उपमहापौर मुझफ्फर हुसेन साहेब ह्यांनी दिले होते आणि ह्या विषयास ही बाब सध्या कोर्टात आहे आणि आजच त्याची तारीख आहे. ग्राऊन्ड ठेवले आहे. गार्डनसाठी सिझव्ह फलॅट ठेवलेले आहे. उद्या त्याच्यावरती मंदिरासाठी किंवा इतर धार्मिक कार्यासाठी परवानगी देण्याचे काम सध्या शांती स्टार बिल्डरने सुरु केलेले आहे आणि ही बाब कोर्टात आहे आणि १ लाख रुपये टाकीच्या बांधकामाची देखभाल करण्यासाठी मंजूर करावे असा मी ठराव मांडत आहे.

**मिलन म्हात्रे:-**

सभापती साहेब ह्याच्यामध्ये सन्मा. सदस्य वैती साहेब ह्यांनी जे सांगितले खर्च ३० टक्के आणि ७० टक्के असे मंजूर झालेले आहे. ह्या येथे आपण जे एक लक्ष रुपये देतोय. त्याच्यामध्ये शांती स्टार नक्की किती रक्कम देणार आहे आणि ती रक्कम देणार आहे का नाही कारण त्याच्यामध्ये सिमीलर खर्च हा सारखा होतोय.

**धनराज अग्रवाल:-**

आपण किती भावाने हयाला पाणी देतो आणि आपण् किती वसुल करतो ते आपण आम्हाला सांगा.

**दशोरे:-**

मीटर लावण्यात आलेले आहे आणि ज्याप्रमाणे ते एम.आय.डी.सी. कडून घेतात. त्याप्रमाणे आपण त्यांना रेट आकरणी केलेली आहे.

**मिलन म्हात्रे:-**

आपण आम्हाला रेट सांगा.

**दशोरे:-**

७ रुपये ८७ पैसे एम.आय.डी.सी.चा रेट आहे. त्या रेटप्रमाणे आपण त्यांना देणार आणि ते १४ रुपये २५ पैसेने देणार.

**धनराज अग्रवाल:-**

साहेब एक लाख रुपये त्यांना दया. पण तेवढेच पैसे तीन लाख रुपये तुम्ही त्यांच्याकडून घ्या.

**आसिफ शेख:-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीसाहेब हयांनी जो ठराव मांडलेला आहे. त्या ठरावास मी अनुमोदन देतो.

**मिलन म्हात्रे:-**

हे बघा तुम्ही कोर्टाचा विषय काढला त्याचे क्लेरीफिकेशन मिळाले आहे का? हयाचा आम्हाला विरोध नाही. पण आपण जे बोललात की त्याची इतर माहिती दया. तीस टक्के नगरपालिका खर्च करणार आणि सत्तर टक्के ते खर्च करणार आहेत. तर त्याचे ते ॲग्रीमेन्ट आहे ते अजून आम्हाला कोणालाही मिळालेले नाही. आपण जी. आर. चा उल्लेख करता. तर हयाची कॉपी आपण आम्हाला द्यायला पाहिजे. त्याच्यात काय लिहिले आहे. अटीशर्ती काय आहेत. देखभालीचा खर्च जर त्यांनी करायचे असे असेल तर.

**आसिफ शेख:-**

सभापती साहेबांनी सांगितले आहे की टिपणीवर ज्याची साइन असेल तो त्याला जबाबदार राहणार आहे.

**मा. सभापती:-**

म्हात्रे साहेब जर त्याच्यावर आयुक्त साहेबांची सही असेल तर ते जबाबदार राहणार आणि ॲग्रीमेन्ट हे झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मंजुरी दिली की, सगळे आले. आपली सही असते. ठाणे, डोंबिवली येथे अनेक केसेस झाल्या त्याच्यामध्ये नगरसेवकांना पकडले. अधिकारी कोणी नाही.

**प्रकरण क्र. १३७ :-**

शांतीनगर वसाहतीस मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा करणे एक लक्ष रुपये देखरेख व गुणनियंत्रणासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देणेसाठी मंजुरी देणे.

**ठराव क्र. ११९ :-**

SaaMtInagar vasaahtIsa imara1Baa[-Mdr mahanagarpailakocyaa 50 d.la.ila. paNaI purvaza yaaojanaotuna paNaI purvaza krNaosaazI Saasana stravar inaNa-ya Gao}na SaaMtIsTar ivakasak va imara1Baa[-Mdr mahanagarpailaka yaaMcaomaQyao ivdpxaIya krarnaamaa hao}na SaaMtInagar 3imara raoD´ vasaahtIsa ]plabQatonausaar paNaI purvaza krNaot yaot Aaho.

idnaaMk 21.07.2003 raojaI maa. mau#ya AiBayaMta 3kaokNa ivaBaaga´¸ zaNao maharaYT/ jaIvana p`aiQakrNa yaaMcao dalanaat SaaMtIsTar ivakasakabaraobar cacaa- JaalaI Asata SaaMtInagar sao@Tr 7 yaoqao baaMQaavayaacyaa 1.10 d.la.laI. xamatocyaa ]Mca jalakuMBaacyaa doKroK va gauNainayaM~NaasaazI 1 laxa $pyao maharaYT/ jaIvana p`aiQakrNaasa doNyaacao zrlao Aaho. tsao ivdpxaIya krarnaamyaat maMjaUrhI Aaho. krIta ]@t 1 laxa $pyao maharaYT/ jaIvana p`aiQakrNaasa doNyaasa maa. sqaayaI saimatI maMjaUrI dot Aaho.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.　　　अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३८ चे वाचन केले.)

**मा. सभापतीः-**

याबाबत महानगरपालिकेकडे कोणतेही धोरण ठरलेले नसल्यामुळे सदरचा विषय पुढच्या सभेत घेण्यात यावा.

**आसिफ शेखः-**

साहेब प्रकरण क्र. १३८ मध्ये रस्ता रुंदीकरणाच्यावेळी सगळयांच्या जागा ताब्यात घेतल्या होत्या व त्यांना पुन्हा शॉपींग सेन्टरमध्ये जागा दिलेली आहे आणि ती विधवा बाई आहे, गरीब बाई आहे. तिने आमच्याकडे विनंती केली. त्या माझ्या प्रभागातील आहे. त्यांनी विनंती केलेले पत्र मी आयुक्त साहेबांना दिले आणि आयुक्त साहेबांनी स्थायी समितीसमोर शिफारस केली व त्याचे धोरण आपण ठरविलेले आहे. रस्ता रंदीकरणामध्ये ज्यांचे ज्यांचे जागा गेले आहे त्यांना आपण जागा दयायचे आहे.

**धनराज अग्रवालः-**

एक विधवा बाई नाही. ज्यांची जागा तोडलेली आहे त्यांना सगळयांना दयावे लागणार.

**आसिफ शेखः-**

सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल तुमच्याकडे जे प्रकरण आले आहे. त्या प्रकरणाबद्यल तुम्हीदेखील शिफारस करा.

**धनराज अग्रवालः-**

आम्ही प्रस्ताव आणला होता. पण हया लोकांनी मंजुरी दिली नव्हती.

**चंद्रकांत वैतीः-**

मा. सभापती साहेबांनी सांगितले आहे की, कुठल्याही प्रकारची सविस्तर माहिती नाही म्हणून आपण सदरचा विषय पुढच्या सभेला घेऊ या.

**मिलन म्हात्रेः-**

हा विषय अगदी साधा आहे. हयाच्यामध्ये महानगरपालिकेला हस्तक्षेप करण्याची गरज नाही. कारणं ही जी विधवा बाई आहे. ह्या बाईच्या नवऱ्याच्या नावाने बिल्डरचे खाजगी ॲग्रीमेन्ट शामा अग्रवालचे आहे. ते मी वाचले आहे. मालकीची जागा त्याच्या प्लॉटमध्ये होती ती नगरपालिकेने तोडली प्रश्न त्या पानाच्या टपरीचा आहे. त्या बिल्डिंगमध्ये जी प्रिमायसेस बाकी आहेत. साहेब आपण त्यांना कुठेही ऑक्युपाईड करुन दयायचे नाही. पुर्नवसन तुम्ही करु नका. तिकच्याकडे बिल्डरचे ॲग्रीमेन्ट आहे. सोसायटीकडे मोकळी जागा आहे. चार बाय तीनचे जागा आहे. आपण त्याच ठिकाणी जर काहीच संबंध राहणार नाही. ॲग्रीमेन्ट मागून घ्या. ते ॲग्रीमेन्ट त्या अर्जाला आहे. ॲग्रीमेन्टनुसार त्या बिल्डरला बोलावून घ्या व ती सोसायटी अजून फर्म झालेली नाही. साहेब आपण ह्याच्यावर योग्य ती रुलिंग देऊन हा विषय संपवून टाका.

**रिटा शाहः-**

साहेब आपण असे कसे रुलिंग देणार. त्या बिल्डरने इनलिगल काम केले कार्पोरेशनने तोडले. मग तुम्ही ते इनलिगल बांधकामाची जबाबदारी कशी काय घेणार आणि असे तुमच्याकडे किती लोक येणार आणि तुम्ही असे किती लोकांना जागा देणार आहे. माझ्या बिल्डिंगमध्ये पण तसचा प्रश्न उद्‌भवलेला आहे आणि कोर्टात मॅटर चालू आहे. मग तुम्ही अशा लोकांना जागा देणार आहे का? मग सर्व लोकांना मी तुमच्यासमोर आणते.

**मा. सभापतीः-**

संबंधित कागदपत्र बघून आपण त्यांना जागा देऊ व त्याच्यावर निर्णय घेऊ या.

**आसिफ शेखः-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी सांगितले आहे की, ती जागा बिल्डरने ॲग्रीमेन्ट करुन दिले आहे. महापालिकेने फुटपाथ, गटार बांधताना ते तोडले आहे. तिथे बाजूला जागा उपलब्ध आहे. आपण कागदपत्र तपासा, बिल्डरला बोलवा व त्या विधवाबाईचे पुर्नवसन करुन टाका आणि हयामध्ये इलिगलचा प्रश्न कुठे येतो.

**मा. सभापतीः-**

कागदपत्र तपासून आपण हयाच्यावर निर्णय घेऊ.

**मिलन म्हात्रेः-**

केळकर सो. अतिक्रमण हा भाग निराळा आहे आणि हे जे ॲग्रीमेन्ट आहे ते जवळ जवळ २५ ते ३० वर्षाचे जुने आहे.

**रिटा शाहः-**

जुने होते तर कार्पोरेशनने तोडायला नाही पाहिजे.

**मिलन म्हात्रेः-**

हे रोड वायडिंगमध्ये गेले होते.

**रिटा शाहः-**

रोड वायडिंगमध्ये काम चालू होते तेव्हा तुम्ही त्या बाईला बोलावून तिच्यासोबत डिस्कशन केले होते का नाही? तुम्ही त्यांना लेखी काय दिले होते का नाही? रोड रुंदीकरण असेच झाले होते का ?

**आसिफ शेखः-**

माजी स्वातंत्र्य सैनिकाची ती विधवा बाई. तिचे वय कमीत कमी ७० वर्षाच्या पलीकडे आणि तिने जवळ जवळ पाच ते सहा महिने फेऱ्या मारल्या. तिला कुठेच काय न्याय मिळाला नाही. त्या माझ्या प्रभागात आहे म्हणून तिने मला पत्र दिले व त्यानंतर हा विषय सभागृहापुढे आला आहे.

**रिटा शाहः-**

ती विधवा आहे आणि तिची काय अडचण आहे व रस्तारुंदीकरणामध्ये गेले असेल त्यांना तुम्ही दया. पण असे काही दुकाने आहेत सोसायटीमध्ये जी सोसायटीच्या पत्रव्यवहाराने तोडलेले आहे. त्यांना तुम्ही परत पुर्नवसन करुन देणार आहात का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख, रिटा शाह, मिलन म्हात्रेजी हयांनी जी भूमिका हयामध्ये मांडली. त्यामध्ये संबंधित बाई स्वातंत्र्य सैनिकाची विधवा पत्नी आहे व त्या सर्व परिस्थितीचा विचार करुन व कागदपत्रे तपासून योग्य तो निर्णय आपण लवकरात लवकर घेऊ.

**मिलन म्हात्रे:-**

खाजगी जागेमध्ये आपण त्यांना विस्थापित करायचे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

त्याच्याकडे जर असे पेपर असेल तर शंभर फिटाच्या जागेमध्येच त्यांना विस्थापित करणार.

**आसिफ शेख:-**

आपण किती दिवसात याबाबत निर्णय घेणार आहात.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

एक-दोन दिवसात निर्णय घेतो.

**अनंत पाटील:-**

अध्यक्ष महोदय, आमच्याकडेसुध्दा ग्रामपंचायतीपासून रोड वायडिंगमध्ये ज्या काही भू भाडयाची जागा आहे. ते आतापर्यंत भू भाडे भरताहेत. त्यांना अजून जागा उपलब्ध करुन दिली नाही. त्यांचा प्रस्तावदेखील आपण घ्यावे. आतापर्यंत भू भाडे भरत असल्या लोकांना तुम्हाला जागा दयायला हरकत नाही.

**मा. सभापती:-**

असे जे आहेत. त्यांना आपण बोलावून घ्या.

**रिटा शाह:-**

असे काम करताना आपण स्थानिक नगरसेवकांना विश्वासात घ्या.

**प्रकरण क्र. १३८:-**

माजी सैनिकांचे पत्नीने मागणी केल्यानुसार पर्यायी जागा देणेबाबत

(मा. सभापती सो. यांच्या आदेशानुसार सदर विषय पुढील सभेत ठेवण्यांत आला.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३९ चे वाचन केले.)

**दिपक खांबीत:-**

खेळणी बसविण्यात आलेली आहे. आता अवलोकनासाठी सभागृहासमोर सादर करण्यात आलेले आहे.

**मिलन म्हात्रे:-**

हयाच्यामध्ये सभागृहाचे रुलिंग मागच्या वेळेला काय होते? सभागृहाचे रुलिंग असे होत. ज्या ज्या उदयानामध्ये खेळणी नाही त्याचे प्रस्ताव नगरसेवकांनी पाठवा आम्ही ते मंजुर करु.

**मा. सभापती:-**

तसे पत्र आलेले नाही.

**मिलन म्हात्रे:-**

आमचे पत्र आहे आणि ते गार्डन १९९५ पासून आहे व तिथे जी खेळणी लागलेली नाही. तिथे ती खेळणी लावावीत म्हणून मागच्या वेळी सभापतींनी सांगितले की, तुम्ही प्रस्ताव पाठवा आम्ही त्याच्यामध्ये खेळणी लावू.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्य गेल्या सभेत हया विषयावर चर्चा झाली होती. इतर नगरसेवकांचे प्रस्ताव घेउन त्या त्या वार्डामध्ये गार्डनमध्ये खेळणी दुरुस्त करणे आहे. अगर नविन लावणे आहे. तर त्याबाबतचे प्रस्ताव ज्यांचे आले असेल त्या प्रस्तावाबाबत तातडीने विचार करुन निर्णय घेण्यात यावे.

**आसिफ शेख:-**

पुढच्या सभेत आपण पुर्नवियोजनचा विषय घ्या. फुटपाथ बांधकामाचे जे विषय आहेत ते देखील आपण एकत्र करुन घ्यावे.

**प्रकरण क्र. १३९**

राव तलाव उदयानामध्ये विविध खेळणी बसविणे कामी आलेल्या निविदेस मंजुरी देणे.

**ठराव क्र. १२० :-**

idnaaMk 04.08.2003 raojaIcyaa **‘saaPtahIk saurja p`kaSa’** yaa vaR<ap~at p`isaQd Jaalaolyaa jaahIr inaivada saucanao nausaar Baa[-Mdr ³p´ yaoqaIla ravatlaava ]Vanaat ivaivaQa KoLNaI basaivaNao kamaI KalaIla zokodaraMnaI maudtIt baabavaar dr saadr kolaolao Aahot. Kca- $.10¸00¸000À¹

| **A. Ë.** | **KoLNyaaMca a tpiSala** | **zokodaracao naava** | | |
|---|---|---|---|---|
| | | **mao. AirhMt [MDsT/Iyala ka^pao-roSana ila.** | **mao. eSalyaa [MTrp`ayajao sa** | **mao. idpk ejansaI** |
| | | **dr ³sava-kraMsahIt´ p`. naga $.** | **dr ³sava-kraMsahIt´ p`. naga $.** | **dr ³sava-kraMsahIt´ p`. naga $.** |
| 1 | jaa^laI svaIMga | 31¸300À¹ | 33¸200À¹ | 32¸700À¹ |
| 2 | baDI saI ¹ saa^ | 14¸700À¹ | 15¸750À¹ | 15¸450À¹ |
| 3 | sar@yaular svaIMga AsaoblaI | 23¸300À¹ | 24¸700À¹ | 24¸300À¹ |
| 4 | malTIprpja Plao isasTIma | 3¸96¸000À¹ | 4¸17¸000À¹ | 4¸09¸500À¹ |
| 5 | ra^kIMga baaoT | 6¸500À¹ | 7¸250À¹ | 7¸000À¹ |
| 6 | jaa^laI gaao ra}MD | 47¸500À¹ | 50¸000À¹ | 49¸650À¹ |
| 7 | sa^Tolaa[-T @laa[-bar | 31¸200À¹ | 33¸000À¹ | 32¸750À¹ |
| 8 | raolar slaa[-D 2.1maI. | 54¸200À¹ | 58¸400À¹ | 57¸225À¹ |
| 9 | Aama- ra[-Dr | 10¸500À¹ | 12¸500À¹ | 11¸000À¹ |
| 10 | DIla@sa baoMca | 9¸700À¹ | 10¸300À¹ | 10¸200À¹ |
| 11 | A^naImala DsTbaIna | 6¸200À¹ | 7¸400À¹ | 7¸000À¹ |
| 12 | DIla@sa svaIMga | 30¸000À¹ | 32¸500À¹ | 31¸000À¹ |
| 13 | malTI ¹ isaTr saI ¹ saa^ | 11¸300À¹ | 12¸100À¹ | 11¸900À¹ |
| 14 | glaa[-Dr | 18¸000À¹ | 19¸750À¹ | 18¸800À¹ |
| 15 | laUp rMga | 16¸500À¹ | 17¸500À¹ | 17¸250À¹ |

| A. Ë. | KoLNyaaMca a tpiSala | zokodaracao naava | | |
|---|---|---|---|---|
| | | mao. AirhMt [MDsT/Iyala ka^pao-roSana ila. | mao. eSaIyaa [MTrp`ayajao sa | mao. idpk ejansaI |
| | | dr ³sava-kraMsahIt´ p`. naga $. | dr ³sava-kraMsahIt´ p`. naga $. | dr ³sava-kraMsahIt´ p`. naga $. |
| 16 | imanaI sanasaoT @laa[-bar | 16¸800À¹ | 18¸000À¹ | 17¸500À¹ |
| 17 | imanaI Tyauba slaa[-D | 1¸13¸000À¹ | 1¸20¸000À¹ | 1¸18¸000À¹ |
| 18 | jaa^laI slaa[-Dr | 28¸000À¹ | 29¸500À¹ | 29¸000À¹ |

varIla tulanaa%mak t@ta pahta zokodar mao. AirhMt [MDsT/Iyala ka^pao-roSana ila. yaaMnaI saadr kolaolaI inaivada hI savaa-t kmaI dracaI Asalyaanao va sadr inaivadacaa Kca- $. 10.00 laxa rkmaocyaa Aat maQaIla Asalyaanao maa. Aayau@t yaaMnaI maMjaUr kolyaanaUsaar zokodarasaaobat krarnaamaa k$na kayaa-doSa doNyaat Aalaolao Aahot. trI sadr inaivadasa kolaolyaa kaya-vaahIsa kayaao-<ar maMjaUrI doNyaat yaot Aaho. sadr kamaI zokodaracaI vaoLaovaoLI yaoNaa¹yaa doyakaMcyaa p`danaasa maMjaUrI doNyaat yaot Aaho.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापतीः-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.०० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**